सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ११९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजणार! निवडणूक आयोगाचे सरकारला महत्त्वाचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ मुंबई**

सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर राज्यातील महापालिका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर प्रशासकीय पातळीवर हालचालींना वेग आला आहे. अशातच आता निवडणूक आयोगाकडून राज्य सरकारला प्रभाग रचनेसंबंधी सूचना देण्यात आल्या आहेत, त्यामुळे लवकरच स्थानिक स्वराज्य




संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजण्याची शक्यता आहे.

राज्यातील रखडलेल्या महापालिका त्याचबरोबर नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मोर्चेबांधणी सुरु केली आहे. सुप्रीम कोर्टाने चार आठवड्यांमध्ये प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने आता महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. निवडणूक आयोगाकडून प्रभाग रचनेबाबतच्या सूचना राज्य सरकारला दिल्या आहेत. राज्य सरकारकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर आरक्षण आणि मतदार याद्या अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

राज्य सरकारकडून या आठवड्यात प्रभाग रचनेची माहिती राज्य निवडणूक आयोगाला सादर केली जाण्याची शक्यता आहे. महिनाभरापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश दिला असला तरी या मुदतीत म्हणजे सप्टेंबरपर्यंत ही प्रक्रिया पार पाडणे शक्य नाही. सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला मुदतवाढीचीही मुभा दिली आहे.त्यामुळे राज्य निवडणूक आयोग सर्वोच न्यायालयाकडे मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करू शकतो. तसेच प्रत्यक्ष निवडणुका ऑक्टोबरमध्ये दोन टप्प्यांमध्ये होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, राज्याच्या राजकीय वर्तुळातही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे वाहत आहेत. भाजप, शिवसेनेकडून निवडणुकांची मोर्चेबांधणी सुरु केली असून भाजप स्वबळावर लढणार असल्याच्या चर्चाही सुरु झाल्या आहेत. दुसरीकडे शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांच्याकडे मुंबई पालिका निवडणुकीत १०० जागांची मागणी केल्याचेही सांगण्यात येत आहे.

## महायुतीचा वाद चिघळला, राष्ट्रवादीच्या नेत्याकडून शिंदेसेनेच्या शिलेदारांची मुघलांच्या वंशजांशी तुलना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२रायगड**

भरत गोगावले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये आमदार महेंद्र थोरवे आणि आमदार महेंद्र दळवी यांनी सुनील तटकरे यांच्यावर टीका केली. या टीकेला उत्तर देताना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी थोरवे, दळवींसह भरत गोगावले यांच्यावर निशाणा साधला. शिंदेंच्या शिलेदारांची तुलना परांजपे यांनी मुघलांशी केली.

रविवारी पुन्हा एकदा रायगडमध्ये कलयुगातील मुघलांच्या वंशजांनी आपली गरळ ओकली. खासदार सुनील तटकरे २०२९ ला पुन्हा एकदा रायगडचं नेतृत्त्व करुन लोकसभेला विजयी होतीलच, पण ज्या रुमालाचा उल्लेख आपण केला, त्या रुमालाने



आपला चेहरा लपवून आपल्याला पुढचं आयुष्य जगायला लागेल अशी वेळ रायगडची जनता तुमच्यावर आणेल', असे वक्तव्य आनंद परांजपे यांनी केले.

'सुनील तटकरे यांच्यावर खालच्या पातळीची टिका करणारे शिवसेनेचे मंत्री, दोन्ही आमदार हे महायुतीमध्ये मुघलांप्रमाणे आक्रमण करत असतात. महेंद्र थोरवेचं तर मला खास करुन आश्चर्य वाटत, मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आहे. मला त्यांना आठवण करुन द्यायची आहे की २०१९ मध्ये त्यांचा शिवसेनेत प्रवेश झाला. तुमचे डान्स बारचे संस्कार, टेबलवर नाचताना अखंड भारताने गुवाहाटीमध्ये पाहिले आहेत. महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे तुम्ही आपल्या औकातीत रहा आणि खासदार सुनील तटकरे यांचा नादाला लागू नका' असे म्हणत परांजपे यांनी भरत गोगावले आणि त्यांच्या साथीदारांवर टीका केली.

## हुंडा बंद, २०० लोकांत लग्न; मराठा समाजाची आचारसंहिता जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ पुणे**

पुण्यातील वैष्णवी हगवणेच्या आत्महत्येनंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. शाही विवाह सोहळे, हुंडा, मानपान, लग्नातले दिखावे याची जोरदार चर्चा सुरू झाली. हुंडा अन् लग्नातील इतर गोष्टीवर मराठा समाजाने पुरोगामी पाऊल उचलले आहे. मराठा समाजाने लग्न समारंभांसाठी नवीन आचारसंहिता लागू केली आहे. नगरमध्ये त्यासाठी विशेष बैठक बोलवण्यात आली होती. ह. भ. प. बद्रीनाथ महाराज तनपुरे, ह. भ. प. जंगले महाराज शास्त्री, पद्मश्री पोपटराव पवार, माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, सकल मराठा समाजाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत गाडे यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर या बैठकीसाठी उपस्थित होते.

वैष्णवी हगवणे हिच्या आत्महत्येनंतर खडबडून जागं



झालेल्या मराठा समाजामधील लोकांनी अहिल्यानगरात बैठक घेत कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. लग्न साध्या पद्धतीने आणि १०० ते २०० लोकांमध्ये करा, हुंडा प्रथा बंद करा, प्रिवेडींग शूट बंद, यासारखे नियम आचारसंहितेत ठरवण्यात आले आहे. या आचारसंहितेचं पालन करणाऱ्या पालकांचा समाजातर्फे जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासाठी ११ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. मराठा समाजातील लग्न समारंभ साधे, कमी खर्चाचे आणि सामाजिक मूल्यांना प्रोत्साहन देणारे असावेत, असा या निर्णयामागील उद्देश आहे. या नियमांचे पालन न केल्यास सामाजिक बहिष्काराची कारवाई होऊ शकते, असे समितीने स्पष्ट केले आहे. यामुळे समाजात सकारात्मक बदल घडेल आणि आर्थिक ताण कमी होईल, अशी अपेक्षा आहे. या आचारसंहितेला समाजातील सर्व स्तरांतून पाठिंबा मिळत आहे.

## ब्राम्हण हे संख्येने जरी कमी असले तरी ते दुधात साखरेचं काम करतात - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नाशिक**

आपण सगळे हिंदू आहोत, एक है तो सेफ है, आपण सगळे सनातन धर्मीय आहोत असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. धर्म आणि मानके एक आहे. जात पंथ वेगळे असले तरी आपण एक आहोत. सनातन विचार पुढील पिढी पर्यंत घेऊन जायचा आहे. असं ही फडणवीस यावेळी म्हणाले. शिवाय ब्राम्हण हे संख्येने जरी कमी असले तरी ते दुधात साखरेचं काम करत असतात असं वक्तव्य ही यावेळी फडणवीसांनी केलं. नाशिक इथं परशुराम भवनाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते.



इतिहासात कोणतेही असे क्षेत्र नाही ज्यामध्ये चित्तपावन समाजाची लोकं दिसत नाहीत. मग स्वात्रंत्र्य चळवळ असो की कला क्षेत्र असो प्रत्येक क्षेत्रात या समाजाचं मोठं योगदान राहीलं आहे. साहित्य क्षेत्रातही कोणती ही १० नावं काढली तर त्यात ३-४ नावं चित्तपावन समाजाची मिळतीलच असं ही यावेळी फडणवीस म्हणाले. राजकीय क्षेत्रात संख्या महत्त्वाची असते. ब्रह्मण बोटावर मोजण्या इतके आहेत. पण ब्राह्मण समाजाचं काम दुधात साखरेसारखं असतं असं ही ते यावेळी म्हणाले. यावेळी चित्तपावन ब्राह्मण संघाचे त्यांनी अभिनंदन केले. नाशिकमध्ये अतिशय सुंदर भवन उभारलं आहे. त्याच्या उद्घाटनाची संधी दिल्या बद्दल आपण सर्वांचे आभारी आहोत असं ही फडणवीस यावेळी म्हणाले. हॉस्टेलसुद्धा उभारले आहे. अमृत स्नानाच्या तारखांची आज घोषणा करायची होती. त्यासाठी आलो होतो असं ते म्हणाले. ९३ वर्षे सातत्यानं ही संघटना काम करत आहे. १९३३ ला जी सभा झाली होती, त्याचे सुद्धा इतिवृत्त इथं वाचायला मिळालं. गरजू लोकांना मदत करता आली पाहिजे असं फडणवीस यावेळी म्हणाले.जातीय व्यवस्था असू नये असे वाटते, पण जात कधीच जात नाही हे ही फडणवीसांनी मान्य केलं. जातीय विषमता नसावी असे वाटते. राजकीय क्षेत्रात संख्या महत्त्वाची असते. ब्राह्मण समाजाची संख्या बोटावर मोजण्या इतकीच आहे. असं असलं तरी ब्राह्मण समाजाचं काम दुधात साखरेचं आहे. चिमूटभर साखर टाकली तरी गोडवा तयार करण्याचं काम, हा समाज करतो हे कधी ही विसरता कामा नये असं ही ते यावेळी म्हणाले.

## आता पुरुषांनाही एसटीच्या प्रवासात विशेष सूट, परिवहन मंत्र्यांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

एसटीच्या प्रवासात आता पुरूषांनाही विशेष सवलत मिळणार आहे, याबाबतची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. एसटीच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त यशवंत नाट्य मंदिर येथे आयोजित केलेल्या नाविन्यपूर्ण योजनांचा शुभारंभ आणि गौरव पुरस्कार सोहळ्यानिमित्त बोलत होते. एसटीच्या प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी परिवहन मंत्र्यांनी रविवारी घोषणा केली. त्यानुसार आता महिलाच नव्हे तर पुरुषांनाही एसटीच्या प्रवासात विशेष सवलत मिळणार आहे.



त्यासाठी नेमकी एसटी प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना १५ टक्के सवलत देण्याची घोषणा यावेळी प्रताप सरनाईक यांनी केली. कमी गर्दी असणाऱ्या हंगामामध्ये प्रवाशांची संख्या वाढावी, त्यामुळे लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना तिकीट दरामध्ये १५ टक्के सवलत देण्याची घोषणा सरनाईक यांनी केली. फ्लेक्सी फेअर असं या योजनेचं नाव असेल. येत्या जुलैपासून ही योजना कार्यान्वित होणार आहे. याचा फायदा ई- शिवनेरी सारख्या बसने प्रवास करणाऱ्या अनेक लोकांना होणार आहे.

## राज्यात वृक्षारोपण ठप्प, ५६८ कोटींचा निधी वापरात न येता वाया जाण्याची शक्यता

### गतवर्षीपासून वृक्ष लागवडीकडे दुर्लक्ष; अभिसरण योजनेचे निकष हिरवळीला बाधक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

महाराष्ट्रात केवळ १७ टक्के एवढेच वृक्ष आच्छादन असल्याचा अहवाल केंद्र सरकारच्या वन आणि पर्यावरण विभागाने नुकताच प्रसिद्ध केला आहे. ही बाब राज्यासाठी अतिशय धोकादायक असून, गतवर्षीपासून वृक्षारोपणाची कामे ठप्प आहेत. जून महिना उजाडला असताना, वृक्ष लागवडीची कामे हाती घेण्यात आली नाहीत. तर, दुसरीकडे




सामाजिक वनीकरण आणि वन विभाग प्रादेशिकच्या रोपवाटिकेत ३ कोटी १७लाख ८० हजार रोपे वृक्षलागवडीच्या प्रतीक्षेत आहेत. यात शून्य ते ९, ९ ते १८ आणि १८ महिन्यांवरील रोपांचा समावेश आहे.

राज्यात वन विभागात गतवर्षीपासून अभिसरण योजना लागू करण्यात आली. मात्र, रोहयोतून कामे आणि जाचक अटींमुळे वन विभागात अभिसरण योजना जणू फेल झाल्याचे चित्र आहे. अर्थसंकल्पात निधी मंजूर असला, तरी यातून यंदा वृक्षारोपणाची एकही कामे घेण्यात आली नाहीत. तर, मागील वर्षी अकोला, बुलढाणा व अमरावती जिल्ह्यातून प्रथम वर्षाची कामे न झाल्याने निधी परत गेला, हे विशेष. राज्य शासनाचे २४०४९२ या योजनेकडे दुर्लक्ष चालविले आहे.राज्य शासनाने सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम, महत्वाच्या रस्त्यांच्या दुतर्फा असणाऱ्या टेकड्यांचे हरितीकरण आणि रस्ते, कालवे व रेल्वे लाइन यांचे दुतर्फा वृक्ष लागवड करणे या वृक्षलावगडीच्या प्रमुख तीन महत्त्वाच्या योजनांसाठी ५६८ कोटींचा निधी मंजूर केला आहे. मात्र, या योजनेसाठी एकाही वनवृत्तातून प्रस्ताव सादर नसल्याची माहिती आहे.

## मधमाशांना कळतो प्रेमाचा स्पर्श; अमरावतीच्या मधुसखींनी सांगितला मधुमक्षिका पालनाचा अनुभव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मेळघाट**

खायला गोड आणि चवदार असणारा मध प्रत्येकाला चाखायला आवडतो. पण, मधमाशांचं पोळं पाहून अनेकांना भीती वाटते. असे असले तरी मेळघाटात चिखलदरा येथील रहिवासी असणाऱ्या प्रमिला कंदीलवार आणि सुमन कासदेकर या दोन 'मधुसखी' महिलांच्या चेहऱ्यावर मधमाशा निंवातपणं घोंगावतात. हे दृश्य पाहून अनेकांना आश्चर्य वाटते.

जन्मापासूनच मधमाशांसोबत जवळचा संबंध आला. वडील आणि भाऊ जंगलातून मध काढून आणायचे. वयाच्या चौथ्या आणि पाचव्या वर्षापासून मधाच्या पोळ्यातील मध काढणं आम्ही शिकलो. मधमाशी ही चावत नाही, हे लक्षात आलं. लहानपणापासून मधमाशांचा अनुभव असला तरी संपूर्ण चेहऱ्यावर पहिल्यांदाच मार्च महिन्यात मधमाशा बसल्यात. राज्य सरकारच्यावतीनं ३ मार्च ते ९ मार्च या सात दिवसांच्या कालावधीचं मधुमक्षिका पालन





प्रशिक्षण बडनेरा लगत दुर्गापूर येथील कृषी विज्ञान केंद्र येथे आयोजित केलं होतं. त्या प्रशिक्षणात मी आणि सुमन कासदेकर दोघीही सहभागी झालो. त्यावेळी पहिल्यांदा माझ्या चेहऱ्यावर शेकडा मधमाशा येऊन बसल्या होत्या. त्यावेळी एकटी सुमन वगळता इतर प्रशिक्षणार्थी घाबरले. यापूर्वी अंगावर अनेकदा एक दोन मधमाशा बसल्यात. मात्र, मधमाशांचा इतका मोठा गुच्छा माझ्या चेहऱ्यावर पहिल्यांदाच बसला. तो क्षण अविस्मरणीय होता. आता, असा प्रकार नेहेमीचा झाला, असा अनुभव मधुसखी प्रमिला कंदीलवार यांनी सांगितला.

मधमाशांना कळतो प्रेमाचा स्पर्श- मधमाशा या अतिशय हुशार आहेत. या मधमाशांमध्ये सर्वपिक्षा आकारानं थोडी मोठी आणि आकर्षक असणारी माशी ही राणी माशी असते. या राणी माशीचा निर्णय इतर माशांना मान्य असतो. चिखलदरा येथील आयटीआय कॉलेज परिसरात झाडावरून मधमाशांचं पोळं खाली पडलं. माशा इकडे तिकडे उडायला लागल्या. यामुळं परिसरात भीती निर्माण आली. आम्हा दोघींना तिथल्या चौकीदारांनी बोलावलं. आम्ही जमिनीवर पडलेलं हे पोळं उचलून घरी आणलं. या पोळ्यात असणारी राणी माशी आणि तिची अंडी हे सोबत होती. त्यामुळे पोळ्यातील सर्व मधमाशा आमच्या घरी आल्यात. लहान बाळाला आपण रागवलो तर ते रडते. प्रेमानं जवळ घेतलं की हसते. अगदी तशीच स्पर्शाची जाणीव या मधमाशांना आहे. यामुळं आमच्यासोबत राहताना त्यांना आपण सुरक्षित आहोत, याची पूर्ण खात्री आहे. यामुळंच आमच्या अंगावर या मधमाशा बसतात, अशी माहितीदेखील प्रमिला कंदीलवार यांनी दिली.

## संपादकीय ......

# हुंड्याची कीड!

गेले काही दिवस पुण्याच्या मुळशी तालुक्यातील वैष्णवी हगवणे यांचे मृत्यू प्रकरण गाजत असून, हुंड्यासाठी छळ होऊन तिची हत्या केल्याचा आरोप तिच्या आई-वडिलांनी केला आहे. याप्रकरणी फरार असलेला वैष्णवीचा सासरा राजेंद्र आणि दीर सुशील यांना पोलिसांनी अटक केली असून, यापूर्वीच सासू आणि नणंदेला ताब्यात घेण्यात आले आहे. सुरुवातीला वैष्णवीने आत्महत्या केल्याचे सांगितले जात होते; पण तिच्या शरीरावर व-ण आढळल्याने तिची हत्या झाली असावी, असा संशय व्यक्त करण्यात येऊ लागला. वैष्णवी कस्पटे आणि शशांक हगवणे यांचा विवाह २८ एप्रिल २०२३ रोजी झाला. त्यानंतर सासरच्या लोकांकडून तिला सतत त्रास दिला जात असल्याचे वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. १९६१ मध्ये देशात हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला; पण आजही सर्रासपणे हुंडा दिला-घेतला जातो. वैष्णवीच्या लग्नाच्या वेळीच ५१ तोळे सोने, सात किलो चांदीची भांडी, आलिशान गाडी आणि शिवाय विवाहाचा खर्च एवढा सर्व भार कस्पटे यांना सोसावा लागला. वैष्णवी गरोदर असताना तिला निर्दयपणे मारहाण करण्यात आली. यानंतर २७ नोव्हेंबर २०२३ रोजी वैष्णवीने आत्महत्येचा प्रयत्न केला. बरी झाल्यावर ती पुन्हा सासरी गेली; पण जाच काही संपला नाही. गुन्ह्याचे दोषारोपपत्र वेळेत दाखल न केल्याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. या प्रकरणात फरार झालेल्या नीलेश चव्हाणलाही पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यापूर्वीच बाळाचा कायदेशीर ताबा वैष्णवीच्या आईकडे देण्यात आला आहे.

सुरुवातीला हुंडा घेण्यासाठी दंड होता. कारण, तो कायदा दिवाणी स्वरूपाचा होता. नंतरच्या काळात भारतीय दंडविधानात ३०४-ब व ४९८-अ या कलमांचा अंतर्भाव करून हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा ठरवण्यात आला. लग्नाच्या वेळी आधी व नंतर एका पक्षाने दुसर्या पक्षास कोणत्याही प्रकारची संपत्ती व मौल्यवान वस्तू देणे वा देण्याचा करार करणे म्हणजे हुंडा, अशी हुंड्याची व्याख्या करण्यात आली. या कायद्यान्वये हुंडा घेणार्या वा तो घेण्यास प्रवृत्त करणार्या व्यक्तीला ६ महिने तुरुंगवास व ५ हजार रुपयांपर्यंत दंड, अशी शिक्षेची तरतूद करण्यात आली. लग्न करण्याच्या बदल्यात म्हणून रोख रक्कम किंवा बक्षीस या गोष्टी घेतल्यास तोही हुंडाच मानण्यात येईल, अशी व्यवस्था कायद्यात करण्यात आली. कायदा केल्यानंतरही हुंडाबळीच्या घटना लक्षणीय प्रमाणात झाल्याचे आढळल्यावर १९८६ मध्ये कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. त्यातील ३०४-ब कलमानुसार, लग्नानंतर ७ वर्षांच्या आत पत्नीचा मृत्यू झाल्यास व त्यापूर्वी तिला त्रास दिला गेल्याचे आढळल्यास त्याला 'हुंडाबळी' मानण्यात येते. आरोपीला ७ वर्षे ते जन्मठेप अशी शिक्षा होऊ शकते. याच कायद्याच्या ४९८-ब अनुसार, हुंड्याच्या मागणीवरून छळ केला गेल्यास आरोपीला तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास व दंडाची तरतूद करण्यात आली. १९७९ मध्ये तरविंदर सिंह या महिलेला हुंड्यासाठी सासरच्यांनी जाळून टाकले. या घटनेची योग्य दखल न घेता पोलिसांनी तिची आत्महत्या म्हणून नोंद केली. त्याविरुद्ध महिला संघटनांनी देशभर जोरदार आंदोलन केले. हुंडाबळीच्या विरोधातील हे पहिले संघटित आंदोलन होते. त्यानंतर पुण्यात विवाहितेला नवर्याने जीवे मारले, असा आरोप झाला. स्थानिक न्यायालयाने त्याला दोषी मानले व मुंबई उच्च न्यायालयाने त्याला मृत्युदंडाची शिक्षा दिली; परंतु सर्वोच्च न्यायालयात नवर्याची निर्दोष सुटका झाली. त्यानंतर ठिकठिकाणी हुंडाविरोधी परिषदा होऊ लागल्या आणि १९८०च्या दशकात संबंधित कायद्यात सुधारणा झाली, तरीही हुंडाबळीच्या प्रकरणांची तक्रार नोंदवून घेण्यास पोलीस टाळाटाळ करतात. पोलिसांकडून सहकार्य मिळत नसल्याच्या असंख्य तक्रारी आहेत. चिरीमिरी देऊन प्रकरणे दाबून टाकण्याकडेही कल असतो. कडक कायदे होऊनही ९५ टक्के लग्नामध्ये मुलीच्या घरच्यांनी या ना त्या प्रकारे हुंडा दिल्याचे जागतिक बँकेच्याच एका अहवालात आढळून आले आहे. याच अहवालात मुलापेक्षा मुलीकडे लोक लग्नात सातपट अधिक खर्च करतात. ग्रामीण भागातील सरासरी निव्वळ हुंडा वार्षिक घरगुती कमाईच्या १४ टक्के असल्याची धक्कादायक निरीक्षणेही त्यात नोंदवण्यात आली होती.

भारतात सर्वाधिक साक्षरता असलेल्या केरळमध्ये सर्वाधिक हुंडा घेतला जातो. पंजाब, हरियाणा आणि गुजरातसारख्या राज्यांत हुंडा घेण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. मुळात विवाहाचा खर्चच वाढत चालला असून, हुंडा मागणे वा देणे यात आपण काही चूक करत आहोत, असे बहुसंख्यांना वाटतच नाही. 'परंपरे'च्या नावाने अन्याय केला जातो व तो सहज स्वीकारलाही जातो. कुटुंबाच्या खोट्या प्रतिष्ठेपायी बर्याचदा मुली हा अन्याय सहन करतात आणि माहेरची माणसे मुलीमागे खंबीरपणे उभी राहतातच, असे नाही. सधन कुटुंबांतील सुशिक्षित स्त्रियाही मूकपणे सर्व काही सोसतच राहिल्या आणि त्यांचे पालकही मुकाटपणे जावयाच्या जमीन, कार, मोबाईल, सोने-नाणे अशा सगळ्याच मागण्या पूर्ण करत राहिले, तर दोष कोणाला द्यायचा? वास्तविक 'दिल्या घरी तू सुखी राहा' असे म्हणताना त्रास झाला, तर तुला माहेरचे दरवाजे उघडे आहेत, असा दिलासा पालकांनी द्यायला हवा. तसेच कोणत्याही प्रकारे हुंडा देणार वा घेणार नाही, अशी सामूहिक शपथ तरुणवर्गाने घ्यायला हवी. सामाजिक प्रबोधनाची प्रक्रियाही कुठेतरी खंडित झाल्याने अशा प्रवृत्तींचे फावते. देश विकासाची नवी शिखरे गाठत असताना सामाजिक स्वास्थ्याचा निर्देशांक घसरताना दिसतो. या प्रश्नावरही व्यक्ती, कुटुंब, समाज याबाबत कायदे करण्याची आणि ते काटेकोर लागू करण्याची जबाबदारी आहे, त्या शासन संस्थेने ठोसपणे काम करण्याची गरज आहे. ती किती आहे, हे वैष्णवीच्या मृत्यूने पुन्हा एकदा दाखवून दिले. गरज आहे ती, ही कीड मुळापासून नष्ट करण्याची!

# शेतकरी ओळख क्रमांक नोंदणीसाठी यावली शहीद येथे ग्रामसभा



**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.२नांदगाव पेठ –** तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अमरावती अंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या शेतकरी ओळख क्रमांक बाबत जनजागृतीसाठी यावली शहीद येथील ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या ग्रामसभेत यावली शहीद येथील सहाय्यक कृषी अधिकारी ज्योती ठाकरे यांनी फार्मर आयडीचे महत्त्व आणि त्यासंदर्भातील सविस्तर माहिती वाचनाद्वारे शेतकऱ्यांना दिली. ग्रामसभेत पीएम किसान योजनेंतर्गत प्रलंबित लाभार्थींची यादी,मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड, पोकरा योजनेत कृषी ताईंची निवड अशा महत्त्वपूर्ण विषयांवरही चर्चा करण्यात आली.शेतकरी ओळख क्रमांक तयार करण्यासाठी ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. या पार्श्वभूमीवर यावली शहीद गावात आतापर्यंत ६५ टक्के नोंदणी झाली असून, अंतर्गत येणाऱ्या गावांपैकी औरंगपूर – ६६%, भगवानपूर – ७०%, नरसिंगपूर – ७०%, देवापूर – ७१% आणि भारतपूर – ६९% इतकी नोंदणी पूर्ण झाली आहे.

उर्वरित शेतकऱ्यांसाठी गावपातळीवर मुनादी देऊन शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, ग्रामपंचायत कार्यालयात नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. शिबिरदरम्यान शेतकरी बांधवांना फार्मर आयडीचे महत्त्व, त्याचे फायदे तसेच विविध योजनांसंदर्भातील माहिती जसे की प्रधानमंत्री किसान सन्माननिधी, नमो शेतकरी महासन्माननिधी, पीक कर्ज योजना, पीक विमा योजना, आपत्ती व्यवस्थापन अनुदान, आणि किमान आधारभूत किंमत खरेदी योजना – याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उर्वरित शेतकरी बांधवांनी आपली नोंदणी पूर्ण करून शासनछ विविध योजनांचा लाभ घ्यावा , असे आवाहन यावली येथील सरपंच शिल्पा खवले, तालुका कृषी अधिकारी प्रशांत गुल्हाने, मंडळ कृषी अधिकारी नीता कवाने, उपकृषी अधिकारी शुभांगी बोंडे आणि सहाय्यक कृषी अधिकारी ज्योती ठाकरे यांनी संयुक्तपणे केले आहे.




# केसांसाठी रामबाण उपाय ठरतो लिंबू, जाणून घ्या कसा वापर करावा

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**



रूक्ष, निस्तेज आणि गळणारे केस यामुळे त्रस्त असाल आणि कोणता घरगुती उपाय शोधत असाल, तर त्याचे उत्तर तुमच्या स्वयंपाकघरातच आहे. लिंबूमध्ये असलेले अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल गुणधर्म केसांच्या समस्यांवर रामबाण उपाय ठरू शकतात. लिंबाचा वापर विविध प्रकारे केला जाऊ शकतो. जसे लिंबू पाण्याचा स्प्रे, एलोवेरासोबत हेअर मास्क, दह्याच्या मिश्रणासोबत किंवा नारळ तेलात मिसळून. या सर्व उपायांनी केस गळती, डँड्रफ आणि स्कॅल्प इन्फेक्शन यावर नियंत्रण मिळवता येते.

**केसांसाठी लिंबूचा योग्य वापर कसा करावा?**

**लिंबू पाणी:** २-४ लिंबूचे रस काढून त्यात पाणी मिसळून शँपू केल्यानंतर केसांवर लावा. यामुळे डँड्रफ कमी होतो आणि स्कॅल्प स्वच्छ राहतो.

**लिंबू + एलोवेरा जेल:**लिंबूमध्ये जंतुनाशक गुणधर्म असतात आणि एलोवेरा केसांना मॉइश्चर देतो. हे मिश्रण अर्धा तास लावून ठेवा, आठवड्यातून २ वेळा वापरल्यास केस मऊ आणि चमकदार होतात.

**लिंबू + दही:**लिंबू स्कॅल्प इन्फेक्शन कमी करतो, तर दही केसांसाठी कंडिशनरप्रमाणे काम करते. हेअर फॉल थांबवण्यास आणि केस मजबूत करण्यास मदत होते.

**लिंबू + नारळ तेल:** नारळ तेल स्कॅल्प हायड्रेट करतं, तर लिंबू डँड्रफ कमी करतो. हे मिश्रण केसांना पोषण देते आणि संक्रमणापासून संरक्षण करते.

लिंबाचा रस केसांवर लावल्यावर लगेच सूर्यप्रकाशात जाऊ नका, यामुळे केस कोरडे आणि रंग उडाल्यासारखे होऊ शकतात.

संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी लिंबाचा रस थेट न लावता इतर घटकांबरोबर मिसळून वापरावा.

आठवड्यातून २ पेक्षा जास्त वेळा लिंबू वापरू नये, कारण जास्त प्रमाणात वापरल्यास केस कोरडे होऊ शकतात.

**लिंबूचे केसांसाठी अधिक फायदे**

**१. स्कॅल्प डिटॉक्स करते:**

लिंबू स्कॅल्पवर साचलेले मृत पेशी, केमिकल्स, धूळ आणि प्रदूषण दूर करून टाळू डिटॉक्स करते.

**२. केसांची वाढ वाढवते:**

लिंबूतील व्हिटॅमिन उ कोलाजेन निर्मितीस चालना देतो, जे केसांची वाढ (काळी त्रींह) वाढवण्यासाठी महत्त्वाचे आहे.

**३. ऑइल कंट्रोल करतो:**

लिंबूमध्ये असलेले सिडिक गुणधर्म टाळूवरील अतिरिक्त तेल नियंत्रित करतात आणि केस हलके व ताजे ठेवतात.

**४. जळजळ कमी करतो:**

लिंबूचा रस स्कॅल्पवरील खाज, जळजळ किंवा रॅशेससुद्धा कमी करू शकतो, याचे थंडावणारे आणि बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म मुळे.

# खरीपातील पिकांची कीड व रोगमुक्त उगवण होण्यासाठी पेरणीपूर्वी करा हे सोपे उपाय

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

खरीप हंगाम तोंडावर आला असून, शेतकरी सध्या पेरणीपूर्व तयारीत व्यस्त आहेत. या पार्श्वभूमीवर बीजप्रक्रिया हा अत्यंत महत्त्वाचा आणि अनिवार्य टप्पा मानला जात आहे. मात्र, अजूनही अनेक शेतकरी बीजप्रक्रिया या टप्प्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे, ज्यामुळे त्यांना उत्पादनात फटका बसतो.

शेतीत यशस्वी आणि भरघोस उत्पादनासाठी बीजप्रक्रिया ही पहिली आणि महत्त्वाची पायरी आहे. योग्य बियाण्यांची निवड, योग्य प्रक्रिया आणि योग्य साठवणूक या गोष्टी शेतकऱ्याला मालामाल करू शकतात.

बीजप्रक्रियेमुळे बियाण्यांची उगवण क्षमता वाढते, तसेच बुरशीजन्य आणि जिवाणूजन्य रोगांचा धोका कमी होतो. परिणामी, उगम चांगला होतो आणि पिकांची वाढ सशक्त होते.

**थायरम, मॅन्कोझेब, अ‍ॅझोटोबॅक्टरची भूमिका महत्त्वाची**

**थायरम** : बुरशीजन्य रोगांपासून बियाण्याचे संरक्षण.

**मॅन्कोझेब** : विविध बुरशीजन्य रोगांविरुद्ध प्रभावी बुरशीनाशक.

अ‍ॅझोटोबॅक्टर : नत्र स्थिरीकरणासाठी उपयुक्त जैविक खत, उगम व वाढ सुधारतो.

बियाण्यावर रोग प्रतिबंधात्मक उपाय काय कराल?

प्रमाणित आणि रोगमुक्त बियाण्यांची निवड करा. तसेच बीजप्रक्रियेसाठी योग्य कीटकनाशक व बुरशीनाशक वापरा, उदा. थायरम, कॅप्टन, ट्रायकोडर्मा आदी बियाणे सावलीत वाऱ्यावर वाळवा थेट उन्हात नको. बियाणे साठवताना कोरड्या, स्वच्छ आणि हवेशीर ठिकाणी ठेवा. बीजप्रक्रिया केल्यानंतर लगेचच पेरणी करा. ही काळजी घेतल्यास बियाण्यांना सुरुवातीपासूनच रोगांपासून संरक्षण मिळते आणि उगम सुधारतो.

**बीजप्रक्रियेनंतर बियाणे सावलीत वाळवणे आवश्यक**

बीजप्रक्रियेनंतर बियाणे सावलीत वाळवणे आवश्यक आहे. उन्हात वाळवल्यास बियाण्यांची गुणवत्ता आणि उगवण क्षमता घटू शकते. सावलीत वाळवल्यास, बियाणे योग्य आर्द्रतेवर वाळतात आणि त्यांची उगवणक्षमता टिकून राहते.

पिकाच्या उगवणक्षमता वाढीसाठी बीज प्रक्रिया आवश्यक बीजप्रक्रियेमुळे बियाण्यांची उगवणक्षमता वाढते. बुरशीजन्य व जिवाणूजन्य रोगांपासून सुरुवातीपासूनच संरक्षण मिळते. उगम चांगला होतो व रोपे सशक्त वाढतात. उत्पादनात लक्षणीय वाढ होते. कमी खर्चात अधिक फायदा मिळतो. एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी बीजप्रक्रिया पहिला टप्पा आहे.

**पाण्यावर तरंगणाऱ्या बिया काढून टाका**

बियाणे निवडताना पाण्यात ते भिजवा आणि पाण्यावर तरंगणाऱ्या बिया खराब, कमकुवत किंवा उगवण क्षमतेस अयोग्य असतात, अशा बियांची पेरणी केल्यास उगवण कमजोर होण्याची शक्यता असते. अशा पाण्यावर तरंगणाऱ्या बिया काढून टाका. पाण्यात बुडणाऱ्या बियाण्यांचीच पेरणीसाठी निवड करा.

**खते, बियाणे खरेदीच्या पावत्या जपून ठेवा**

पावत्या म्हणजे खरेदीचा अधिकृत पुरावा या पावत्या बोगस बियाणे किंवा खते आढळल्यास तक्रार करताना उपयोगी येतात. शासनाच्या भरपाई योजनेत पावत्यांची आवश्यकता असते. वेष्टन, पिशवी, टॅग, थोडेसे बियाणे पिकाची कापणी होईपर्यंत जपून ठेवा. पुरावा म्हणून कामात येतात.

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बीजप्रक्रिया हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. अनेक शेतकरी अद्याप या प्रक्रियेचे महत्त्व पूर्णतः लक्षात घेत नाहीत.

योग्य बीजप्रक्रिया केल्यास पिकांचा उगम सुधारतो, रोग व कीड नियंत्रणात येतात आणि उत्पादनात वाढ होते. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने बियाण्यांची निवड, प्रक्रिया आणि साठवणूक याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.



खरीपाची महत्वाची पायरी


शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# मोसमी पावसाचा प्रवास १० जूनपर्यंत रखडणार

# अमरावतीसह विदर्भात पारा पुन्हा ४० पर्यंत !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** हवामान शाखज्ञांचा अंदाज खरा ठरला असून मोसमी पावसाचा प्रवास किमान १० जूनपर्यंत तरी रखडला आहे. केवळ पश्चिम किनारपट्टी व राज्यातील काही भागात हलक्या पावसाची शक्यता आहे. वातावरणात बदल झाला असून मोसमी पावसाच्या प्रवासाची गती कमी झाली आणि आता मोसमी पावसाचा प्रवास पूर्णपणे रखडला आहे. वातावरणातील या बदलांमुळे कमाल तापमानात वाढ होईल. त्यामुळे अमरावतीसह विदर्भात पुढील आठ दिवस तापमानाचा पारा पुन्हा ४० अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याची शक्यता आहे. मराठवाडा व खानदेशात देखील कमाल तापमान ३५ ते ४० अंश सेल्सिअस पर्यंत राहील.किमान दहा जूनपर्यंत तरी मोसमी पाऊस पुढे सरकण्याची कोणतीही शक्यता नाही. केवळ पश्चिम किनारपट्टी व राज्यात काही भागात हलका पाऊस पडण्याचा अंदाज आहे. राज्यातील बहुतांश भागात मात्र कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे. या कोरड्या हवामानाचा वाईट परिणाम पेरणी आणि लागवडीवर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.



**कोरड्या हवामानाचा परिणाम पेरणी – लागवडीवर शेतकऱ्यांनी पेरणी आणि लागवडीची घाई करू नये**

**पावसाची शक्यता कुठे..**

राज्यात पालघर, ठाणे, मुंबई या जिल्ह्यांमध्ये आजपासून चार जूनपर्यंत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. आज मुंबईसह ठाण्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे, तर पालघरमध्ये हलक्या पावसाच्या सरीची शक्यता आहे. चार जून दरम्यान या तिन्ही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस कायम राहील. रायगड, रत्नागिरी, सिधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये मध्यम पावसाची शक्यता आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २ जून २०२५

शहर/ग्रामिण


# गुजरातमधून आलेले २५०० पाकीट अनधिकृत एचटीबीटी बियाणे जप्त

## खासगी बसद्वारे नागपुरात जाणार होती २५ लाखांची खेप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–**
गुजरातमधील अहमदाबाद येथून अमरावतीमार्गे नागपूरला जाणाऱ्या खासगी बसमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित एचटीबीटी बियाणे असल्याची माहिती कृषी विभागाच्या पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे येथील वेलकम पॉइंटवर सापळा रचून त्या बसची तपासणी केली असता २५ लाखांचे तब्बल अडीच हजार पाकिटे प्रतिबंधित एचटीबीटी बियाणे मिळून आले. हे बियाणे कृषी विभागाच्या पथकाने जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कृषी विभागाच्या पथकाने माहितीवरून वेलकम पॉइंटवर सापळा रचला. या वेळी अहमदाबादहून आलेल्या एका बसची तपासणी केली असता बसच्या खालील बाजूला असलेल्या डिकीत एचटीबीटीच्या अडीच हजार पाकिटांचा साठा आढळला. हा माल अहमदाबादेतील ग्रो सिड्स नामक कंपनीकडून नागपूर येथील अमितभाई या व्यक्तीच्या नावे जात असल्याचे समोर आले. तसेच ६४०० प्रिंट केलेले रिकामे प्लास्टिक पॅकेट होते, ते अहमदाबाद येथील साई




क्रिएशनकडून नागपुरातील राजू भारमासेकडे जात असल्याचे कृषी विभागाच्या पाहणीत समोर आले. पथकाने त्या बसच्या चालकाकडे विचारणा केली, त्यावेळी त्याने एक लिफाफा त्यांना दिला. हा लिफाफा ज्या ठिकाणी माल उतरणार होता, त्याच ठिकाणी द्यायचा आहे, असे त्याने सांगितले. त्या लिफाफ्यावर माल कुठून आला व कोणासाठी आला हे नमुद होते. याच लिफाफ्यावरील माहितीच्या आधारे ग्री सिड्स, साई क्रिएशन, अमित भाई, राजू भारमासे ही नावे समोर आली. मात्र प्रत्यक्ष त्यांचा संबंध यात आहे का हे पोलिस तपासात समोर येईल. दरम्यान जप्त केलेल्या या एचटीबीटी बियाण्यांची किंमत २५ लाख रुपये आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांत गुन्हा दाखल केला. ही कारवाई विभागीय कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे, एसएओ राहुल सातपुते यांच्या मार्गदर्शनात तंत्र अधिकारी (गुण नियंत्रक) राजेश जानकर, श्रीकांत नागे आणि प्रदीप वानखडे यांनी केली. दरम्यान जप्त केलेल्या या पाकिटांवर कोणत्याही निर्मात्याचे नाव नाही, बॅच क्रमांक नाही, एमआरपी नाही. मागील महिनाभरात कृषी विभागाच्या पथकाने जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी प्रतिबंधित अनधिकृत एचटीबीटीच्या एकूण सहा कारवाया केल्या आहेत. यापूर्वी ५०, १०० पाकिटांच्या वर माल मिळाला नव्हता. आजची कारवाई मात्र मोठी आहे. विशेष म्हणजे रविवारी जप्त केलेले अडीच हजार पाकिटे तथा यापूर्वीच्या पाच कारवायांत जप्त केलेला अनधिकृत एचटीबीटी बियाण्यांचा माल हा गुजरातमधूनच आल्याचे समोर आले होते. यावरून गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणात एचटीबीटी बियाण्यांची निर्मिती झाल्याचे स्पष्ट होत आहे.

### कृषी विभागाकडून कारवाई : प्रत्येक कारवाईत जप्त केलेला माल गुजरातचा

कृषी विभागाने प्रतिबंधित बियाण्यांचा हा साठा रविवारी सकाळी पकडताच काही राजकीय व्यक्तींकडून कृषी अधिकाऱ्यांना कॉल येण्यास सुरुवात झाली होती. यावरून हा साठा नागपुरात ज्या कोण्या व्यक्तीसाठी जात होता, त्याचे राजकीय व्यक्तीसोबत 'संबंध' असावेत, मात्र कृषी अधिकाऱ्यांनी कोणतेही दडपण न घेता आपापले मोबाइल 'स्विच ऑफ' करून कारवाई पूर्ण केली. पोलिस प्रकरणाच्या खोलात गेल्यास कॉल करणारे कोण, यामागे नेमका कोणत्या राजकीय व्यक्तीचा 'इंट्रेस' आहे, हे समोर येऊ शकते. मात्र त्यासाठी पोलिसांनी सखोल तपास करणे गरजेचे आहे. आतापर्यंत झालेल्या पाच कारवायांमध्ये मात्र पोलिसांकडून सखोल तपास झालेला नाही, हे विशेष.

# राज्यात तूर्तास शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पद भरती नाहीच!

## आधी समायोजन नंतरच निर्णयशिक्षण संचालकांचे स्पष्ट निर्देश

**सुधीर केने**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती–**
८राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने ४ एप्रिल २०२५ रोजी अध्यादेश काढून राज्यात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा मार्ग मोकळा केला होता .मात्र, आता हा मार्ग तूर्तास थांबविण्यात आला आहे. राज्यात सध्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करू नये ,आधी अतिरिक्त पदांचे समायोजन केले जाईल त्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल असे स्पष्ट निर्देश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिले आहे.राज्यात मान्यता प्राप्त खाजगी अंशतः, पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील हजारो शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत .त्यामुळे या जागा भरण्याबाबत वारंवार मागणी केली जात होती. दरम्यान ४ एप्रिल २०२५ रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने अध्यादेश काढला. त्यानंतर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीचे प्रमाण निश्चित करण्यात आले .राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः, पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी सुधारित आकृतीबंध लागू करण्यात आला. शासन निर्णयानुसार विद्यार्थी पटसंख्येच्या




निर्देश दिले. पूर्वी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेला मान्यता देण्यात आली होती . २७ मे २०२५ रोजी शिक्षण आयुक्त यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये पदभरती बाबत काही निर्देश आधारे शिक्षकेतर संवर्गातील कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक ,मुख्य लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहाय्यक ही नियमित पदे मंजूर करण्यात आली होती .त्याबाबतच्या अटी व शर्ती या अध्यादेशात देण्यात आल्या होत्या. त्यामुळे शिक्षण संस्थांमध्ये कमालीचा उत्साह संचारला होता.परंतु त्यांचा हा उत्साह फार काळ टिकला नाही. २८ मे २०२५ रोजी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक ,माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना देण्यात आले. सन २०२३_२४ च्या संच मान्यता निर्गमित करण्यात आल्या आहेत तथापि सन २४-२५ च्या ऑनलाईन संच मान्यता निर्गमित करण्याची कार्यवाही एन आय सी च्या माध्यमातून सुरू आहे. सदरच्या संच मान्यता निर्गमित झाल्यानंतर मंजूर होणाऱ्या पदांनुसार मंजूर, अतिरिक्त, रिक्त बाबतचा अहवाल व अतिरिक्त होणारे शिक्षकेतर कर्मचारी यांचे समायोजन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच भरती बाबत निर्णय घेतला जाईल असे स्पष्ट केले आहे .


### अन्यथा प्रशासकीय कारवाई

जोपर्यंत शासन स्तरावर शिक्षकेतर कर्मचारी भरती संदर्भात निर्देश प्राप्त होत नाहीतोपर्यंत कोणत्याही प्रकारची शिक्षकेतर कर्मचारी भरती तसेच या उपरही अनुषंगिक लाभ पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत दिले जाऊ नये ,अन्यथा भरती प्रक्रिया केल्यास किंवा शालार्थ आयडी प्रदान केल्यास त्यास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील व त्यांच्यावर नियमानुसार प्रशासकीय कारवाई केली जाईल असे डॉ.महेश पालकर यांनी स्पष्ट केले आहे.

# पिंपळोदमधून १३०० पाकिटे एचटीबीटी जप्त

## कृषी विभागाकडून दिवसभरात दुसरी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२दर्यापूर–** दर्यापूर तालुक्यातील पिंपळोद गावात अनधिकृत एचटीबीटी बियाण्यांची छुप्या मार्गाने मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याची माहिती कृषी विभागाच्या पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे उपविभागीय कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या पथकाने धाड टाकली. त्यावेळी एका व्यक्तीच्या घरातून तब्बल १३ लाख रुपयांच्या १३०० बॅग अनधिकृत प्रतिबंधित एचटीबीटी बियाणे जप्त करण्यात आले. ही कारवाई रविवारी (दि. १) रात्री ८ वाजेपर्यंतही सुरूच होती. पिंपळोद येथील प्रशांत नवलकर यांच्या घरात मोठ्या प्रमाणात एचटीबीटी बियाणे असल्याची माहिती कृषी विभागाच्या पथकाला मिळाली होती. शिवाय नवलकर या बियाण्यांची अनधिकृतपणे विक्री करत असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. त्यामुळे पथकाने रविवारी दुपारी पिंपळोद गाठले. नवलकरकडे एचटीबीटी बियाणे असून त्याची विक्री करत असल्याची खात्री पटताच पथकाने नवलकरच्या घरी जाऊन झडती घेतली. त्यावेळी कृषी विभागाच्या पथकाला जवळपास १३०० पाकिटे मिळून आली. जप्त केलेल्या या पाकिटांची किंमत सुमारे १३



लाख रुपये आहे. शिवाय या पाकिटावर कोणतेही नाव नाही. त्यामुळे हे बियाणे कुठून विक्रीसाठी आणले, हे तूर्तास समोर आले नाही. मात्र जिल्ह्यात यंदा झालेल्या सहा कारवायांमध्ये जप्त केलेल्या एचटीबीटी बियाण्यांचा पुरवठा हा गुजरातमधून झालेला आहे. त्यामुळे हे बियाणेसुद्धा गुजरातमधूनच आले असावे, असा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान या प्रकरणी कृषी विभागाकडून पोलिसांत तक्रार नोंदविण्यात आली आहे.

# कॉम्रेड मॅरेथॉन: दक्षिण आफ्रिकेमध्ये होणाऱ्या ९० किमी कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये अमरावतीचे १२ धावक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**
जगातील सर्वात खडतर मॅरेथॉनपैकी एक असलेली ९० किमी.ची कॉम्रेड मॅरेथॉन ही दरवर्षी आयोजित करण्यात येते. जगभरातील १२९ देशांमधील धावपटू या स्पर्धेत भाग घेतात. यंदा भारतातील ४१५ धावक कॉम्रेड मॅरेथॉनकरिता पात्र ठरले आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अमरावती जिह्यातील १२ धावक सज्ज असून ते दक्षिण आफ्रिकेकरिता २ जूनला रवाना होत आहे. यात दिलीप पाटील हे २०११ पासून सहभाग घेत आहेत. दहा वेळा कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये भाग घेणारे ते पहिलेच व्यक्ती आहेत. या १२ धावकांमध्ये तीन महिला धावपटूंचाही समावेश आहे.

९० किमी.च्या कॉम्रेड मॅरेथॉनला अल्टिमेट ह्युमन रेस म्हणून ओळखले जाते. कॉम्रेड मॅरेथॉन असोसिएशन दक्षिण आफ्रिकेच्या वतीने रविवार, ८ जून रोजी होणार असून, ही ९८ वी मॅरेथॉन साऊथ आफ्रिकेतील पीटर्सबर्ग शहरापासून सकाळी ५.४५ वाजता सुरू होऊन ती डर्बन या शहरात सायंकाळी ५.४५ वाजता पोहोचणार आहे. या स्पर्धेत अमरावती शहरातील एकुण १२ धावक सहभागी होत आहे.

त्यामध्ये सेवानिवृत्त विक्रीकर उपायुक्त तसेच अमरावती हाफ



मॅरेथॉनचे संचालक व प्रशिक्षक दिलीप पाटील, पोलिस निरीक्षक सतीश उमरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता मंगेश पाटील, पोलिस कर्मचारी राजेश कोचे, लेखाधिकारी संजय अंबाडेकर, डॉ. सागर धनोडकर, प्रमोद राठोड, संजय पाटील, तालुका कृषी अधिकारी अनिल कांबळे, सहायक लेखापाल प्रणिता निस्ताने, सहायक शिक्षिका रितू तलमले, शिक्षणशास्त्र आचार्य डॉ. ऋजुता फुके यांचा समावेश आहे. ही १२ जणांची चमू सोमवारी अमरावती एक्स्प्रेसने मुंबईला जाणार असून, तेथून साऊथ आफ्रिकेला प्रयाण करणार आहे. अमरावतीमधील स्वतःसह ११ स्पर्धाकांची तयारी दिलीप पाटील यांनी जानेवारीपासून सुरू केली होती. एकुण ५ महिन्यांचे खडतर प्रशिक्षण पूर्ण करून हे स्पर्धक कॉम्रेड मॅरेथॉनसाठी रवाना होत आहे. ५ महिन्याच्या प्रशिक्षण दरम्यान सर्व स्पर्धकांनी २ वेळा ६० किमीचे लाँग रन तर ४२ ते ५० चे ३ तसेच दर रविवारी किमान ३६ किमीचे लाँग रन पूर्ण केले आहे. सर्व स्पर्धकांना अमरावती रोड रनर्स ग्रुप, सायकलिंग असोसिएशन ग्रुप, पोलिस आयुक्त कार्यालयाकडून शुभेच्छा देण्यात आल्या. स्पर्धकाला ६ कट ऑफ वेळेत पूर्ण करावे लागतात कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये सहभागी स्पर्धकाला ९० किमीमध्ये एकुण ६ पडाव (कट ऑफ) विहित वेळेत पूर्ण करावे लागतात. विहित वेळेत पडाव पूर्ण न केलेल्या स्पर्धकाला त्याच ठिकाणी बाद करून परत पाठवले जाते. तसेच ही मॅरेथॉन गन टाइमवर सुरू होते. गन टाईमपासून बरोबर १२ तासाने रेस संपवली जाते. १२ तासानंतर कुणालाही फिनिश लाईन क्रॉस करता येत नाही.

# चार तासांत लावला खुनाचा छडा,गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई

## सुरज उर्फ सावत्या हत्याकांडातील पाचही आरोपींना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ नांदगाव पेठ**
नांदगावपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३१ मे रोजी घडलेल्या सूरज उर्फ सावत्या दिवाकर सावते याच्या हत्याकांड प्रकरणाचा अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट-२ ने अवघ्या चार तासांत छडा लावत पाच आरोपींना अटक केली आहे.गुन्हे शाखेच्या या तत्परता दाखवणाऱ्या कारवाईमुळे गुन्हेगारांच्या मनात पोलिसांची धास्ती निर्माण झाली आहे. शनिवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास सुरज उर्फ सावत्या हा शेगाव रहाटगाव रोडवरील सिद्धांत बार मध्ये मित्रासोबत मद्यप्राशन करत असतांना अचानक दोन हल्लेखोरांनी त्याच्यावर हल्ला केला. सावत्या जीव वाचविण्यासाठी बारच्या मागील दाराने धावत गेला मात्र त्याठिकाणी सुद्धा काही हल्लेखोर दबा धरून बसले होते आणि सावत्याला पकडून त्याच्या मानेवर, पोटावर चाकूने वार केले. सावत्या रक्ताच्या थारोळ्यात पडला असतांना एकाने मोठा दगड



त्याच्या चेहऱ्यावर टाकून पाचही हल्लेखोर तेथून पसार झाले. या प्रकरणाचा नांदगावपेठ पोलीस ठाण्यात दाखल करून हल्लेखोरांवर भादंवि कलम १०३(२), ११५(२), ११८(१), १९१(२), १९१(३), १९० नुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेला सोपवला.

त्यांच्या निर्देशानुसार, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारावकर व सागर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथके तयार करण्यात आली. गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वात तपास सुरू करण्यात आला. आरोपींचा पाठलाग करत त्यांना रात्रीच्या वेळी ताब्यात घेतले.यामध्ये सुनिल सुरेश वानखडे (३५, रा. जिल्हा परिषद शाळेजवळ शेगाव, अमरावती), दिपक सुधीर निस्ताने (२५), रोहीत अशोक खंडारे (२४), विक्की उमेश शेंडे (२३) तिघेही रा. मालखेड, अक्षय वसंत चव्हाण (१९, रा. लालखेड) या आरोपींचा समावेश आहे.चौकशीत सर्व आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांना पुढील कारवाईसाठी नांदगावपेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# रन फॉर सेफ्टीसाठी धावले कर्मचारी:मॅरेथॉन स्पर्धा

## १ ते ६ जून दरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती –** आम्ही सुरक्षेचे शिल्पकार शुन्य अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार ही संकल्पना घेऊन मॅरेथॉन – रन फॉर सेफ्टीसाठी परिमंडळात हजारो कर्मचारी धावले मुख्य अभियंता अशोक साळुंके आणि पोलिस उपायुक्त सागर पाटील यांनी हिरवी झेंडे देत रन फॉर सेफ्टी महावितरणला विद्युत भवन येथून सुरूवात करण्यात आली.यावेळी मार्गदर्शन करतांना पोलीस उपायुक्त सागर पाटील म्हणाले की, अपघात हा अपघातच असतो. विद्युत अपघात सुरक्षा जनजागृतीसाठी महावितरणचा मॅरेथॉन रन फॉर सेफ्टीच्या माध्यमातून शुन्य अपघाताचे लक्ष हा संदेश सर्वांपर्यंत पोहचेल. असे प्रतिपादन पाटील यांनी केले. तसेच यावेळी मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी विद्युत अपघात होणारच नाही. यासाठी महावितरण कर्मचारी आणि ग्राहक दोघांनीही जाणीवपूर्वक काळजी घेतली पाहिजे. असे आवाहन केले. तत्पूर्वी ६ जुन रोजी होणाऱ्या महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त विद्युत सुरक्षा जनजागृतीसाठी महावितरणतर्फे १ ते ६ जुन दरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. त्याची सुरूवात रविवार १ जुन रोजी मॅरेथॉन-रन फॉर सेफ्टीने करण्यात आली.त्याचबरोबर विद्यार्थी, ग्राहक यांच्यासाठी विद्युत सुरक्षा प्रश्नमंजूशा लिंक पाठवून ऑनलाईन स्पर्धा घेत जनजागृती करण्यात आली. तसेच वीज ग्राहकांना विद्युत सुरक्षा विषयी इमेल पाठविण्यात आले. अमरावती परिमंडळात मॅरेथॉन -रन फॉर सेफ्टीला विद्युत भवन येथून सुरूवात झाली. त्यानंतर संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक



सभागृह, इर्विन चौक, गर्ल्स हायस्कूल चौक असा मार्गक्रमण करत पुन्हा विद्युत भवन येथे महावितरणच्या मॅराथॉनचा समारोप करण्यात आला.

अमरावती शहरात पार पडलेल्या मॅरेथॉनला ४७३, अचलपूर ५३५ आणि मोर्शी विभागात २५५ सदस्यांचा सहभाग होता. विद्युत सुरक्षेची जनजागृती शेवटच्या ग्राहकांपर्यंत व्हावी. यासाठी अमरावती परिमंडळात विभाग, उपविभाग निहाय मॅरेथॉन रन फॉर सेफ्टीचे आयोजन करण्यात आले.

मॅरेथॉन रन फॉर सेफ्टी अमरावती येथे झालेल्या मॅरेथॉन मध्ये मुख्य अभियंता अशोक साळुंके, पोलिस उपायुक्त सागर पाटील, अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, दिपाली माडेलवार, सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

विद्युत सुरक्षेची जनजागृती शेवटच्या ग्राहकांपर्यंत अमरावती शहरात पार पडलेल्या मॅरेथॉनला ४७३, अचलपूर ५३५ आणि मोर्शी विभागात २५५ सदस्यांचा सहभाग होता. विद्युत सुरक्षेची जनजागृती शेवटच्या ग्राहकांपर्यंत व्हावी. यासाठी अमरावती परिमंडळात विभाग, उपविभाग निहाय मॅरेथॉन रन फॉर सेफ्टीचे आयोजन करण्यात आले.

# जिल्ह्यात ६ लाख ९१ हजार हेक्टरवर होणार पेरणी

## ८९०९५ क्विंटल बियाण्यांची मागणी

### रासायनिक खताची १.४३ मेट्रीक टन मागणी मंजूर

विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती १६जिल्ह्यात मान्सून दाखल होताच शेतकऱ्यांनीसुध्दा खरिपाच्या पेरणीची लगबग सुरु केली आहे. तर दुसरीकडे कृषी विभागाने खरीप हंगामाची पूर्वतयारी सुरु केली. कृषी विभागाकडून ८९ हजार ०८९५ क्विंटल बियाण्यांचे नियोजन करण्यात आले आहे. अमरावती जिल्ह्याकरिता १.४३ लाख ६६९ मे. टन रासायनिक खतांचे नियोजन करण्यात आले आहे.



**सोयाबीन सर्वाधिक, तूर घरसली**

कृषी विभागाकडून पेरणीकरिता ६ लाख ९१ हजार हेक्टर क्षेत्र प्रस्तावित केले आहे. त्यामध्ये सोयाबीनकरिता सर्वाधिक २ लाख ९७हजार ९१२ हेक्टर क्षेत्र असून कापसाची पेरणी २ लाख ०९ हजार ४१० हेक्टरवर करणार आहे. तुरीच्या क्षेत्रात घट झाली असून १ लाख १२ हजार ८११ हेक्टरवर तुरीची लागवड करण्यात येईल. मूंग २५००३, उडीद ९१७५, ज्वारी २३,०७३ तर मका ८४४६ व भात भुईमूंग व बाजरीची पेरणी ५९६९ हेक्टरवर केली जाईल.

विभागाकडून ८९०९५ क्विंटल बियाणे तर १ लाख ४३ हजार मे. टन खताची मागणी करण्यात आली आहे.

**२.६६ मे. टनाची मागणी, १.४३ मे. टन मंजूर**

जिल्ह्यात गत तीन वर्षात सरासरी १.३० मे. टन रासायनिक खतांचा वापर करण्यात आला. सन २०२४-२५ मध्ये १ लाख ४३ हजार ६६९ मे.टन खताची मागणी मंजूर करण्यात आली आहे. यावर्षी २.६६ मे.टन खतांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी ६५ हजार ६५९ मे.टन खतांचा साठा उपलब्ध असल्याने उर्वरित खतांची मागणी करण्यात आली आहे. त्यामध्ये युरियाची ५९१३० मे.टन एवढी डिमांड केली असून ३५४०५ मे.टन मंजूर करण्यात आले. एसएसपी ३७,९०० मे.टन, डिएपी २१,२४४, एमओपी ४५२०, संयुक्त खते ४४,६०० मे.टन खतांचे आवंटन मंजूर करण्यात आले. त्यापैकी युरिया १६९६४ मेटन, एसएसपी २०,९८१ मे.टन, डिएपी ३०२६ मे.टन, एमओपी ३१६७ मे. टन तर संयुक्त खते २१,५५१ मेटन खत उपलब्ध आहेत.

यावर्षी कृषी विभागाने जिल्ह्यात ६ लाख ९१ हजार हेक्टरवर पेरणी होणार असल्याचे नियोजन आखले आहे.

पिकांची काढणी, मळणी करुन शेतकरी शेत नांगरणे, पाळी मारणे, शेतात सेंद्रीय खत टाकणे, गवत काढणे, गवत फवारणीचे काम करीत असल्याचे चित्र दिसत आहे. कृषी विभागाकडून देखील खरीप हंगामाची पूर्वतयारी सुरु करण्यात आली आहे.जिल्ह्यात गतवर्षी ६ लाख ६९ हजार ८४६ हेक्टरवर म्हणजे ९८.२५ टक्के पेरणी झाली होती. कृषी विभागाने यावर्षी खरिपाचे ६ लाख ९१ हजार हेक्टर क्षेत्र प्रस्तावित केले आहे. खरीप हंगामाकरिता कृषी विभागाकडून कृषी सेवा केंद्र चालकांच्या बैठका घेऊन बियाणे, रासायनिक खते व अन्य कृषी निविष्ठा मुबलक प्रमाणात उपलब्ध व्हाव्यात यासाठी नियोजन करण्यात येत आहे. कृषी

# राधासिटी परिसरातून १२.५० लाखांचा गुटखा जप्त

## केशवाणीने पोलीस कोठडीत दिली माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती** - पोलीस कस्टडीत असलेल्या राजेश केशवाणीने दिलेल्या माहितीवरून गाडगेनगर पोलिसांनी रविवारी दुपारी राधासिटी परिसरातील एका गोडाऊनमध्ये धाड टाकली असता गोडाऊममधून १२ लाख ५० हजार रुपयांचा गुटखा जप्त केला.

गुन्हेशाखेच्या पथकाने दोन दिवसाआधी रामपुरी कॅम्प येथील रहिवाशी राजेश केशवाणीच्या घरी धाड टाकली होती. तेव्हा त्याच्या घरातून १० लाखांचा गुटखा जप्त केला होता. तसेच त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला दोन दिवसाची कोठडी सुनावली होती. कस्टडी दरम्यान पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता त्याने पूर्ण माल शेरू नामक व्यक्तीचा आहे आणि त्याचे वलगाव हद्दीतील राधासिटी परिसरात गोडावून आहे असे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी रविवारी दुपारी गोडावूनमध्ये धाड टाकली असता



गोडावूनमधून १२ लाख ५० हजार रुपयांचा गुटखा दिसताच पोलिसांनी जप्त केला. या कारवाईत ठाणेदार दिनेश दहातोंडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक गजानन रोकडे, पोलीस अंमलदार जावेद अहमद, राजू अप्पा, बंडू खडसे, अनुप झगडे, अभिजित गावंडे, प्रताप लोखंडे, विनोद वानखडे, अमित पवार यांच्या समावेश होता.

# ११ जून रोजी साजरा होणार विश्व नेत्रदान दिवस

## आयोजन समितीचे स्थापना विविध कार्यक्रमाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२दर्यापूर** - १० जून संपूर्ण महाराष्ट्रभर जागतिक विश्व नेत्रदान दिवस म्हणून साजरा केला जातो मात्र विविध ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन एवढंच नाही तर जिल्हा स्तरावर सुद्धा आयोजन केल्या जात असल्यामुळे दर्यापूर हरिना फाउंडेशन शाखा दर्यापूर च्या नेतृत्वाखाली हरिना फाउंडेशन महिला शाखा दर्यापूर च्या पुढाकाराने आयोजन करण्यात आले आहे आज नियोजन संदर्भात बैठक एकता ऑप्टिकल एकता हॉस्पिटल दर्यापूर या ठिकाणी झाली असता बैठकीमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरले असून त्याकरिता आयोजन समितीची स्थापना करण्यात आली असून अध्यक्षपदी डॉ अश्विनी अभिजीत देवके यांची तर सौ किरण संदीप गावंडे, सौ शितल दत्ता पाटील कुंभारकर, सौ रूपाली मनोज तायडे, सौ वर्षा गणेश कावडकर, सौ अलका निलेश पारडे आदींचा समावेश असून ११ जूनला जागतिक नेत्रदान दिवसाचे आयोजन करण्यात आले असून जागतिक नेत्रदान दिवस संदर्भात नेत्रदान चिकित्सा शिबिर सकाळी १० वाजता ,शहरातील विविध




ठिकाणी हरिना श्रद्धांजली, पहिल्या ५० गरीब व गरजू यांना अल्प दरात चष्मे वाटप स्व अँड अभिजित दादा देवके स्मृतिप्रीत्यर्थ व स्व लिलाबेन मंगलभाईजी पोपट फाउंडेशन अमरावती यांच्या तर्फे वाटप करण्यात येणार आहे , नेत्रदान विषयावर मार्गदर्शन, एकता ऑप्टिकल एकता हॉस्पिटल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे सौ जयश्री शिवानंद चव्हाण यांनी मरनोत्तर नेत्रदान करण्याची जबाबदारी घेतली आहे बैठकीचे संचालन अध्यक्ष गजानन देशमुख यांनी आभार निलेश पारडे यांनी मानले त्याप्रसंगी हरिना फाउंडेशनचे रामेश्वर मालपाणी, भैया पाटील भारसाकळे ,मनोज पाटील तायडे ,दत्ता पाटील कुंभारकर,किशोर ठाकूर, डॉ. इम्रान खान, गणेश विल्हेकर, सौ शुभांगी अनिल येवले आदी उपस्थित होते.

# एक पेड माँ के नाम...

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा जिल्ह्यात उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**- राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त यावर्षी जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांनी आपल्या घरासमोर आईच्या नावाने एक झाड लावण्याचा अनोखा उपक्रम सुरू करून पर्यावरण दिवस साजरा करण्याचे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.हा अनोखा उपक्रम 'एक पेड माँ के नाम'नुसार राबविण्यात येणार आहे. या उपक्रमात जिल्हा प्रशासनासह स्थानिक स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी, सर्व शासकीय विभागातील अधिकारी, कर्मचारी सहभागी होतील.'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम ५ जून ते १५ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येणार आहे. जागतिक






पर्यावरण दिन हा उपक्रम सुरू करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी सांगितले.जिल्ह्यातील सुमारे एक हजाराहून अधिक गावांमध्ये हा उपक्रम राबवला जाणार आहे. यात १ लाखाहून अधिक वृक्षारोपण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. तसेच ४० हून अधिक स्वयंसेवी संस्था या उपक्रमात सहभागी होणार आहेत. वेगवेगळ्या भागातील १५ हजाराहून अधिक नागरिक या उपक्रमात सहभागी होणार आहेत.या उपक्रमाचा मुख्य उद्देश पर्यावरण संवर्धनाचे महत्व अधोरेखित करणे आणि नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे हा आहे. या अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिक पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात सक्रिय सहभागी होतील आणि पृथ्वीचे रक्षण करण्याचा संकल्प करतील. या अनोख्या उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज सर्किट विशेष ट्रेन ९ जूनपासून

## पर्यटकांनी ऐतिहासिक पर्यटनाचा लाभ घ्यावा - विभागीय आयुक्त श्वेता सिंघल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (आयआरसीट ीसी), ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा अनुभव देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्किट या एका विशेष ट्रेनची घोषणा केली आहे. ही यात्रा भारत गौरव टुरिस्ट ट्रेन अंतर्गत ९ जूनपासून सुरू होत आहे.



या ५ दिवसांच्या विशेष टूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत,

असे सांगत या सहलीद्वारे महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या ठिकाणांचा पर्यटकांनी अनुभव घ्यावा, असे आवाहन विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी केले आहे.

भारत गौरव ट्रेनच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तेजस्वी इतिहासाशी निगडीत धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना व्यापक प्रसिद्धी मिळवून देण्याचा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा मानस आहे. याबाबत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या नेतृत्वाखाली पर्यटन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे, व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सुर्यवंशी आणि पर्यटम संचालक बी. एन. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

**दैनंदिन टूर कार्यक्रम (संक्षिप्त)**

पहिला दिवस : मुंबई-रायगड-पुणे.
दुसरा दिवस : पुणे (लाल महाल, शिवसृष्टी, कसबा गणपती).
तिसरा दिवस : शिवनेरी-भीमाशंकर-पुणे.
चौथा दिवस : प्रतापगड-कोल्हापूर.
पाचवा दिवस : कोल्हापूर-महालक्ष्मी मंदिर-पन्हाळा किल्ला-मुंबई.
सहावा दिवस : मुंबई (टूर समाप्त).
आरक्षण व अधिक माहितीसाठी संपर्क:
आयआरसीटीसी वेबसाईट
www.irctctourism.com

यात्रेदरम्यान, सर्व प्रवाशांचा अनुभव सुखकर आणि संस्मरणीय व्हावा, यासाठी महामंडळाचे अधिकारी आयआरसीटीसीच्या समन्वयाने प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करतील. ५ दिवसांच्या या प्रवासात रेल्वे स्थानकांपासून ते गडकिल्ल्यांपर्यंत, प्रत्येक ठिकाणी इतिहासाच्या पाऊलखुणांचा वेध घेत, पर्यटकांना समृद्ध अनुभव दिला जाईल. प्रत्येक गडकोटावर, ऐतिहासिक स्थळी पर्यटन व्यवस्थेचे काटेकोर नियोजन केले जाईल.

इतिहासावर आधारित कार्यक्रम, गाईड्स, तसेच स्थानिक शिवप्रेमी संघटनांच्या सहकार्याने ही यात्रा अधिक संस्मरणीय करण्यात येईल, असे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सांगितले आहे.

# अवकाळी पावसाच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करा,बाधीत शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत जाहीर करावी

## आ. केवलराम काळेंची पालकमंत्र्यांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२चिखलदरा** - अमरावती जिल्ह्यात १६ ते १८ मे तसेच त्यानंतर झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. मेळघाट विधानसभा मतदार संघातील धारणी, चिखलदरा, अचलपूर तालुक्यातील सुमारे ५१८ हेक्टरवर शेतातील पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पंचनामे करून त्यांना तातडीने आर्थिक मदत पुरवावी, अशी मागणी मेळघाट विधानसभा मतदार संघाचे आमदार केवलराम काळे यांनी आज ३१ मे रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेले पालकमंत्री चंद्रकांत बावनकुळेयांच्याकडे केली आहे.

आ. केवलराम काळे यांच्या निवेदनानुसार, अवकाळी पावसामुळे मेळघाट विधानसभा मतदारसंघातील धारणी, चिखलदरा व अचलपूर तालुक्यांमधील ५१७ हेक्टरपेक्षा जास्त शेतातील पिकांची हानी



झाली. याशिवाय ३०५ घरांची पडझड झाली, ११ मोठे व ६



लहान पशू मृत्यूमुखी पडले. कांदा, उन्हाळी मुग, संत्रा, लिंबू, केळी या फळपिकांसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. महसूल विभागाच्या सर्व्हेक्षणात जिल्ह्यात सर्वात जास्त नुकसान अचलपुर, धारणी, अंजनगावसुर्जी, चिखलदरा तालुक्यात झाल्याचे अहवालात म्हटले आहे. त्यामुळे मेळघाटचे आ. केवलराम काळे यांनी राज्याचे महसूलमंत्री व

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन त्यांना नुकसानीबाबत सविस्तर निवेदन सादर केले. बाधित भागातील नुकसानीचा तातडीने पंचनामा करून शेतकऱ्यांना आणि बाधित कुटुंबीयांना शासनाने तत्काळ आर्थिक मदत पुरवावी, अशी मागणी आ. काळेंनी पालकमंत्री बावनकुळेंकडे केली आहे. तसेच शासनाने पीकविमा व आपत्ती व्यवस्थापनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी विनंतीही आ. काळेंनी केली. अवकाळी पावसामुळे या भागातील अनेक शेतीपिके जमीनदोस्त झाली असून, अनेक घरांची छपरे उडून गेली आहेत. त्यामुळे स्थानिक जनतेसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या गंभीर परिस्थितीत सरकारने संवेदनशीलता दाखवून त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही आ. काळेंनी निवेदनात व्यक्त केली.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या २८ निरीक्षकांची बदली

**अमरावती शहरातील दोन निरीक्षकांचे स्थानांतरण**

**मुंबईतील एक निरीक्षक मोर्शीत रूजू होणार**

**अकोला, बुलढाणा येथील दोन अधिकाऱ्यांची बदली**

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२अमरावती** सध्याघडीला राज्यात सर्व शासकीय, निम शासकीय विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा मौसम सुरू आहे. अशातच गृह विभागाने आज १ जुन रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या २६ निरिक्षकांचीइतरजिल्ह्यात बदली केली आहे. यामध्ये अमरावतीशहरातील दोन निरिक्षकांचा समावेश आहे. तर जिल्ह्यातील मोर्शी येथे मुंबईतील एकानिरिक्षकाला पाठविण्यात आले आहे. या यादीमध्ये अमरावती रेंजमधील अकोला व बुलढाणा येथील दोन निरिक्षकांची बदली करण्यात आली आहे.अमरावती शहरातील एक्साईज विभागाचे निरिक्षक अरिवंदओमप्रकाश गभणे यांची गोंदिया जिल्ह्यातील देवरीयेथे, सिध्दराममक्कपा संकपाल यांची मुंबईत यु-विभागात बदली करण्यात आली आहे. परंतु, दोन्ही अधिकाऱ्यांच्या मोबदल्यात तुर्तास कोणत्याही निरिक्षकांना पाठविण्यात आले नाही. त्याचप्रमाणे मुबंई पी-विभागातील निरिक्षक सुभाष शिवाजी खरे यांची मोर्शी शहरात बदली करण्यात आली आहे. अमरावती -विभागातील अकोलायेथील राजेश कृष्णा सपकाळ यांनी नंदुरबार येथे, बुलढाणा येथील निरिक्षक किशोर रेवा पाटील यांची नाशिमध्ये बदली करण्यात आली आहे.तर चंद्रपुरचेईश्वर नारायणवाघयांना किशोर पाटील यांच्याजागी बुलढाण्यात पाठविण्यात आले आहे. लवकरच हे अधिकारी आपल्या बदलीच्या ठिकाणी रूजू होणार आहे.

# अमरावती जिल्हा बालकल्याण समितीद्वारे वर्षभरात ५५० बालकांचे संरक्षण, १५ विवाहही रोखले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**- जन्मत: सोडून दिलेल्या बेवारस, शोषणग्रस्त किंवा समाजाने दुर्लक्षित केलेल्या बालकांची काळजी घेऊन त्यांना संरक्षण देण्यासाठी सन २०१५ चा बाल न्याय कायदा (बालकांची काळजी व संरक्षण) आहे. या कायद्यान्वये प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा बालकल्याण समिती स्थापन करण्यात आली असून या समितीद्वारे सदर कार्य केले जाते. अमरावतीतही अशी समिती आहे. महिलांच्या नेतृत्वात चालणाऱ्या या समितीमार्फत गेल्या वर्षभरात ५५० बालकांचे जगणे संरक्षित झाले असून सुमारे १५ बालविवाह रोखण्यात आले आहे. या समितीच्या एक सदस्य सुचिता बर्वे यांच्याशी झालेल्या चर्चेअंती समितीच्या एकूणच कामाचा आवाका स्पष्ट झाला.

राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या हातात हात मिसळून ही समिती काम करते. या समितीला अर्धन्यायिक दर्जा (कॉसीज्युडीयस) आहे. त्यामुळे सदर समिती सुनावणी घेऊन दोषीवर योग्य ती कारवाईसुद्धा करु शकते. प्रकरणाची गंभीरता व त्यासंदर्भात हाती आलेले पुरावे या आधारे तसा निर्णय घेतला जातो.

**बालविवाहाच्या प्रकरणांची दखल घेणे**

बाल विवाहाची कुठेही शंका आल्यास, बाल कल्याण समिती थेट दखल घेऊन चौकशी करू शकते. एखाद्या बालकाच्या तक्रारीवरून, पोलिसांकडून किंवा समाजातील व्यक्तीकडून तक्रार प्राप्त झाल्यास समिती लगेच कार्यवाही करण्यासाठी पुढाकार घेते. गेल्या वर्षभरात अशा १५ प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करुन संबंधित बालकांना न्याय मिळवून देण्यात आला. समाजिक उत्तरदायित्वाचा एक भाग म्हणून अशा प्रकरणात संबंधित बालकांची नावे घोषित केली जात नाही. तशी पथ्य पाळली जाते. त्यानंतर संबंधित बालकाला बालकाला तात्पुरत्या निवासगृहात (शेल्टर होम) ठेवले जाते. त्याला वैद्यकीय, मानसिक व कायदेशीर सहाय्य उपलब्ध करून दिले जाते.

# राशनच्या धान्याची खुल्या बाजारात विक्री



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मोर्शी**

राशन दुकानातील धान्याची खुल्या बाजारात विक्री होत असल्याची तक्रार तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. अंत्योदय कार्डधारकांना प्रति कार्ड ३५ किलो धान्य मंजूर झालेले असून त्यामधील कमी युनिट असलेल्या कार्ड धारकांना प्रति युनिट ५ किलो धान्य देतो, याबाबत प्रत्येक कार्डधारकाला ३५ किलो धान्य मिळत आहे की नाही, ही त्या ग्राहकाकडून चौकशी करण्यात यावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

महाराष्ट्र शासनाने जेव्हापासूनई-केवायसी सुरु केली आहे. तेव्हापासून कार्डातील मृत व्यक्तीचे धान्य कार्ड धारकाला दिले जात नाही व ज्या व्यक्तीचे बोटांचे ठसे पॉस मशीनवर येत नाही, अशा कार्डधारकांना धान्य दिले जात नाही. हे सर्व धान्य कार्डधारकांना मिळत नाही. ते धान्य दुकान न. ३ मध्ये दुकानदार मोठ्याप्रमाणात काळ्या बाजारात विकत असल्याची तक्रार तहसील कार्यालयामध्ये देण्यात आली.मागील सहा महिन्यांपासून ज्या कार्डधारकांचे किंवा कार्डमधील व्यक्तीचे आधार लिंक नाही, अशा सर्व ग्राहकांसाठी शासनाने राशन दुकानामध्ये राशन दुकानदारास नावाची लिस्ट चेक करावी, त्या लिस्टनुसार किती लोकांना धान्य मिळाले, हे परस्पर ग्राहकाकडून चौकशी करण्यात यावी. या सर्व प्रकरणात पुरवठा अधिकारी यांनी ई-केवायसीच्या नावाखाली किती कार्ड धारकांना धान्य मिळाले नाही, शासनाचे किती धान्य परवाना धारकाला मिळाले. तेव्हापासून काळ्या बाजारात विक्री केली, याची सखोल परस्पर चौकशी करावी, अशी मागणी निवेदनातून निखिल रमेश राजगुरे यांनी केली आहे.

# खोडके-राणांमध्ये पुन्हा आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

अमरावतीत महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि युवा स्वाभिमान पक्षामध्ये तीव्र मतभेद उफाळून आले आहेत. युवा स्वाभिमान पक्षाचे आमदार रवी राणा आणि राष्ट्रवादीचे आमदार संजय खोडके यांच्यात वाक् युद्ध रंगले आहे.रवी राणा म्हणाले, लोकसभा निवडणुकीच्या वेळी संजय खोडके यांनी महायुतीच्या विरोधात काम केले. प्रचाराच्या फलकांवर स्वत:चे छायाचित्र देखील लावू दिले नाही. त्यांनी उघडपणे नवनीत राणा यांच्या विरोधात प्रचार केला. पण, जेव्हा विधानसभा निवडणुकीच्या वेळी सुलभा खोडके या अमरावतीत राष्ट्रवादीकडून लढत होत्या, तेव्हा अजित पवार यांचे मला ५० वेळा फोन आले. खोडके यांना मदत करा, म्हणून राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांचे देखील फोन आले. केवळ २ हजार मतांनी त्या निवडून आल्या. संजय खोडके हे आज त्या बळावर वाजत आहेत. पण, मी जर वरिष्ठ नेत्यांचे ऐकले नसते आणि अमरावतीतून एक फेरफटका जरी मारला असता, तरी १० हजार मतांनी त्यांना पराभूत केले असते, असा दावा रवी राणा यांनी केला.

संजय खोडके यांनी एवढी गुर्मी करू नये. दादागिरी करू नये, मोठ्या माणसाने नम्र असले पाहिते, लवचिक असले पाहिजे, सगळ्यांना विनंती केली पाहिजे. पण, तीन वेळा पराभूत करूनही त्यांच्यात सुधारणा झाली नाही, जे लोक अहंकारात राहतात, त्यांना जनतेने धडा शिकवला आहे, असा टोला रवी राणा यांनी लगावला.

**संजय खोडके यांचे प्रत्युत्तर**

संजय खोडके म्हणाले, रवी राणा हे नेहमीच मला धमक्या देत आले आहेत. आपण खोडके यांचा तीन वेळा पराभव केल्याचे रवी राणांनी म्हटले आहे. पण, जनता ही कुणाला निवडून द्यायचे हे ठरवत असते. तीन वेळा पराभव झाला, हे आम्ही मान्य केलेच आहे. मला त्याची खंत नाही. पण, रवी राणांमध्ये आपल्याला पराभूत करण्याची ताकद नाही. अजित पवार यांनी पन्नास वेळा फोन केल्याचे त्यांनी सांगितले आहे, पण हे सर्व खोटे आहे. याउलट लोकसभा निवडणुकीच्या वेळी रवी राणांनी अजित पवार यांना फोन केले होते. मी प्रचारात यावे, यासाठी त्यांनी अजित पवार यांच्या सभेचे आयोजन केले होते. विमानतळावरून कार्यक्रमस्थळी जात असताना रवी राणा हे अजितदादांना सतत खोडकेंना स्टेजवर बोलवा, अशी विनवणी करीत होते. पण, खोडके हे येणार नाहीत, हे त्यांनी आपल्याला आधीच सांगितले आहे, तुम्ही बोलावले म्हणून मी प्रचाराला आलो, असे अजितदादांनी रवी राणा यांना सुनावले होते, असा दावा संजय खोडके यांनी केला.

# महावितरणच्या ऑनलाइन खुल्या प्रश्नमंजूषा पोर्टलचे संचालक राजेंद्र पवार यांच्या हस्ते उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

वीज दिसत नाही व अजाणताही दुर्लक्ष झाले तरी माफ करत नाही. विद्युत अपघातात कर्मचारी किंवा कमावत्या व्यक्तींचा मृत्यू झाल्यास त्यांच्या तीन पिढ्यांचे कधीही भरून न येणारे नुकसान होते. त्यामुळे महावितरणचे कर्मचारी किंवा नागरिकांनी विद्युत सुरक्षेबाबत कायम सतर्क राहावे. विद्युत सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे असे आवाहन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी केले.

महावितरणच्या २० व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित विद्युत सुरक्षा सप्ताहानिमित्त कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थी व नागरिकांसाठी ऑनलाइन खुल्या प्रश्नमंजूषा पोर्टलचे (दि.१जुन) उद्घाटन संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते रविवारी (दि. १) चिंचवड (पुणे) येथे झाले. यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे प्रादेशिक संचालक श्री. भुजंग खंदारे, मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे यांची उपस्थिती होती.

संचालक श्री. राजेंद्र पवार म्हणाले की, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी राज्यभरात विद्युत सुरक्षेची जनजागरण मोहीम सुरू करण्याची सूचना केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनात 'शून्य विद्युत अपघाता'चे ध्येय घेऊन विद्युत सुरक्षा सप्ताहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात महावितरणचे कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थी व नागरिकांसाठी महावितरणच्या www.mahadiscom.in वेबसाइटवर ऑनलाइन खुली प्रश्नमंजूषा सुरू करण्यात आली आहे. विद्युत सुरक्षेबाबत अचूक उत्तरे देणाऱ्यांच्या नावे ऑनलाइन प्रमाणपत्र लगेचच मिळणार आहे.

# मोर्शी शहराची स्वच्छता धोक्यात : २१ वॉर्डांसाठी केवळ ४ कचरागाड्या

## नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

मोर्शी शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावताना ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली जाते. परंतु आर्श्चयाची बाब म्हणजे शहरातील संपूर्ण कचऱ्याच्या संकलनासाठी नगर परिषदेजवळ केवळ चारच कचरा गाड्या आहेत. कचरा गाड्या कमी असल्याने नागरिकांना कचऱ्याची विल्हेवाट लावताना अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे प्रत्येक वॉर्डात एक कचरा गाडी सुरू करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. प्रसंगी त्यासाठी अन्यथा जन आंदोलन उभे करण्याचा इशारासुद्धा दिला आहे.



स्वच्छ भारत अभियान ही मोहीम संपूर्ण देशात राबवल्या जात आहे. स्वच्छतेकडून समृद्धीकडे या घोषवाक्य च्या आधारे मोर्शी शहरातही स्वच्छता अभियान राबवल्या जाते. सध्याच्या रचनेनुसार शहरात १० प्रभाग असून २१ सदस्यसंख्या आहे. पूर्वी प्रत्येक नगरसेवकामागे एक याप्रमाणे २१ गाड्या होत्या. त्यामुळे प्रत्येक घरातील कचरा संकलित केला जायचा. परंतु नवीन कंत्राट दिल्यापासून फक्त चारच कचरा गाड्यांद्वारे कचरा संकलित केला जात आहे. चारच गाड्या सुरू असल्याने प्रत्येक वॉर्डात दररोज कचरा गाडी जात नाही. पर्यायाने नागरिकांना आपल्या घरातील कच-याची विल्हेवाट लावताना अडचण निर्माण होत आहे.

कचरा गाडी घरापर्यंत येत नसल्याने अनेक नागरिकांना उघड्यावरच कचरा टाकावा लागतो, त्यामुळे त्या ठिकाणी दुर्गंधी पसरते व नागरिकांना विविध आजाराला बळी पडावे लागते.मोर्शी नगर परिषदेच्या आरोग्य विभागाचे स्वच्छतेकडे कोणतीही लक्ष नसल्याने कंत्राटदार आपल्या मर्जीप्रमाणे वागत आहे. वास्तविक कंत्राटदाराला कंत्राट देताना प्रत्येक घराजवळ कचरा गाडी नेऊन मजुराद्वारे कचरा संकलित केला जाईल, असा करार करण्यात आला आहे. परंतु वस्तुस्थिती अगदी विपरित आहे. त्यामुळे कचरा गाड्यांचा व मजुरांचा मोठा मलिदा हा कंत्राटदार फस्त करीत असल्याचे दिसून येते. याबाबत मोर्शी शहरातील अनेक नागरिकांनी तक्रारी सुद्धा केलेल्या आहे परंतु प्रशासन याकडे लक्ष द्यायला तयार नाही.

दरम्यान शहरात स्वच्छता हवी असल्यास प्रत्येक वॉर्डात एक कचरा गाडी फिरवणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे मोर्शी शहरात कचरा गाडी वाढवून कचरा संकलित करावा, अशी मागणी पुढे आली असून प्रसंगी त्यासाठी जनआंदोलन उभे करण्याचा इशारा माजी नगराध्यक्ष आप्पा रोडे, युवा सामाजिक कार्यकर्ते नीलेश रोडे यांच्यासह जागरूक नागरिकांनी दिला आहे.

# धान्याच्या बदल्यात १५० रुपये देण्याचा निर्णय कागदावरच

## केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना शासनाचा ठेंगा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२परतवाडा**

ज्यातील आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील सर्वच एपीएल (केसरी) रेशन कार्डधारक शेतकऱ्यांना धान्याऐवजी रोख रक्कम देण्याचा शासन निर्णय फक्त कागदावरच उरला आहे. मागील दोन वर्षांपासून या योजनेअंतर्गत न धान्य मिळाले, ना रोख रक्कम. यामुळे हजारो शेतकऱ्यांची शासनाने फसगत करत केसरी शिधापत्रिका धारकांना ठेंगा दाखवला आहे.



अचलपूर तालुक्यात ५ हजार ५०० केसरी शिधापत्रिकाधारक शेतकरी धान्य व रकमेपासून वंचित आहे. त्यापैकी १ हजार ७४७ शेतकऱ्यांनी थेट रकमेसाठी अर्ज केला आहे. मात्र, लाभार्थी शेतकरी अद्यापही वंचित राहिले आहेत. हीच स्थिती संपूर्ण जिल्ह्याची आहे.राज्य शासनाने १५० रुपये प्रती सदस्य दरमहा रोख स्वरूपात थेट बँक खात्यात जमा करण्याचे जाहीर केले होते. यासाठी हजारो शेतकऱ्यांनी आरसीएमएस प्रणालीत नोंदणी करून बँक तपशील सादर केला. परंतु, योजनेचा प्रत्यक्ष लाभ अद्यापही मिळालेला नाही. परिणामी, यापूर्वी मिळत असलेले स्वस्त धान्यही बंद झाले असून, दोन्ही मार्गाने शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरलेले नाही.

अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील हजारो शेतकरी या संकटाला सामोरे जात आहेत. विशेषतः अचलपूर तालुक्यात ५ हजार ५०० केसरी शिधापत्रिका धारक शेतकरी धान्य व रकमेपासून वंचित आहे. त्यापैकी १ हजार ७४७ शेतकऱ्यांनी थेट रकमेसाठी अर्ज केला आहे. मात्र गेल्या दोन वर्षापासून वंचित असणारे शेतकरी पुरवठा विभागात सतत चकरा मारत असतानाही याबाबत अद्याप कोणतीही सकारात्मक कार्यवाही झालेली नाही. केवळ शासनाकडे अनुदानासाठी मागणी केली आहे. असे उत्तर दिले जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. जो रात्रंदिवस शेतात घाम गाळतो, तोच या योजनांपासून वंचित का, शासनाच्या फसव्या योजना व जाहीर घोषणा शेतकऱ्यांच्या जीवनात काहीच बदल घडवून आणत नसल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. निवडणूक काळात दिलेली कर्जमाफीही शेतकऱ्यांना केवळ वचनातच मिळाली. आता रेशन बंद करून रोख रक्कमही न देणे, ही शेतकऱ्यांवरील आणखी एक अन्यायकारक कृती ठरत आहे. शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त करत शासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या योजनेची अशीच अवस्था अमरावती जिल्ह्याची नसून इतर १३ जिल्ह्यांची आहे. यातील बहुतांश शेतकरी या योजनेपासून वंचित आहेत. शासनाने या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना थेट धान्य वितरीत करावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# अ.भा. आंतर विद्यापीठ (पुरुष) सर्वार्थी विद्यापीठ व संघटना बेसबॉल संघ घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

श्री जगदीशप्रसाद झाबरमल टिबरेवाला युनिव्हर्सिटी, राजस्थान येथे १४ ते १७ जून, २०२५ दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल (पुरुष व महिला) सर्व संत गाडगे बाबा साठी अमरावती विद्यापीठाचे संघ घोषित करण्यात आले.

**पुरुष संघ –** चमूलाल खंडेलवाल लोक, अकोलाचा पवन अविरक, वैभव पाठक, रूपेश बाकडे, श्री कला व वाणिज्य रूप, अमरावतीचा अभिषेक स्वर्ग, विशाल कांबे, अमोलचांद, शिवाजी महाराज, यवतमाळ दिपक गजभिये, महात्मा ज्योतिबा फुले, भातकुलीचा स्वप्न कुरवाडे, नाकाश, अंकुश साक्षात ढगेकर, भारतीय भाषा, अमरावतीचा आकाशळंके, ओम सैरीसे, श्री शिवाजी विज्ञान विज्ञान, अमरावतीचा अथर खान, राज्य राज्य सोहळा ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीचा साहिल तायडे, जनता कला व वाणिज्य, मलकापूरचा करणसिंह राजत, रामकृष्ण शेख, दापूरचा अक्षद गवई महात्मा ज्योतिबा फुले, अमरावतीचा यश नन्नवरे यांचा समावेश आहे.

**महिला संघ –** महिला चम्मच महात्मा ज्योतिबा फुले मध्ये, भातकुलीची कु. अंकिता हिवर, कु. गौरी खेतेडे, कु.समृद्धी लोरे, कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची कु. राधिका सिची, कु. साक्षी भारस्कार, श्री शिवाजी विज्ञान विद्या, अमरावतीची कु. तेजस्विनी गुल्हाने, शंकरलाल खंडेलवाल, अकोलाची कु. प्राची कुचर, भारतीय भाषा, अमरावतीची कु. दिपाली ढोले, श्रीमती एन. आर्टस्, कॉमर्स न्ड सायन्स कॉलेज, के.एन., अमरावतीची कु. साक्षी, श्रीमती साळुंकाबाई राऊत चाफल, वनोजाची कु. नेहा बुंदेले, श्रीमती राधाबाई सारडा शब्द, अंजनगाव सुर्जीची कु. शिवानी, जनता कला व वाणिज्य व्यासपीठ, मलकापूरची कु. नंदिनी दीक्षित व कु. श्रृती मंडवाले, रामकृष्ण लोक, दारापूरची कु. सलोनी शाहु, सरस्वती कला लोक, दहिहंडाची कु. रिया डोंगरे, श्रीमती वत्सलाबाई स्वयं महिला, पुसदची कु. हर्षदा बिहाडे यांचा समावेश आहे. निवडक निवडक सर्वांचे कुलगुरू डॉ. मिलींद बाराते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश अनारे यांनी अभिनंदन केले आहे.

# बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती तर्फे १ले राज्यस्तरीय बांधिलकी साहित्य संमेलन मोठ्या थाटात संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती द्वारा आयोजित पहिले राज्यस्तरीय बांधिलकी साहित्य संमेलन शुक्रवार दि. ३० मे रोजी अमरावती येथील कांचन रिसॉर्टमध्ये मोठ्या थाटात संपन्न झाले. या एकदिवशीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक व समीक्षक मा.श्री दा. गो. काळे, उदघाटक जेष्ठ वऱ्हाडी हास्यकवी मा. श्री मिर्झा रफी अहमद बेग,विशेष अतिथी सुप्रसिद्ध साहित्यिक शंकर घोरसे, स्वागताध्यक्ष प्रसिद्ध लेखिका व उद्योजिका तसेच बांधिलकी प्रतिष्ठानच्या संचालिका मा. कांचनताई उल्हे, विशेष अतिथी शंकर घोरसे अक्षरक्रांती फाऊंडेशन नागपूर तर प्रमुख अतिथी तसेच कविसंमेलनाचे अध्यक्ष आणि कथाकथन सत्रातील कथाकार म्हणून प्रा. डॉ. सतीश तराळ उपस्थित होते त्यामुळे रसिक वर्ग आनंदी होता . प्रा. डॉ. शोभाताई रोकडे,डॉ. शोभाताई गायकवाड,मा. बाबारावजी गावंडे, मा उद्धव शहाणे,मा. आबासाहेब कडू,सुप्रसिद्ध गझलकार मा. अनंत



नांदुरकर (खलिश )अजीज खान पठाण आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची शानदार सुरुवात दत्त नवनाथ भजनी मंडळ नवसारी यांच्या साथीने अगदी नियोजित वेळेत ग्रंथदिंडीनेकरण्यात आली.त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पुजन व दिपप्रज्वलन करून विधिवत संमेलनाचे उदघाटन श्री. मिर्झा रफी अहमद बेग यांचे हस्ते पार पडले.सौ. भावना देशपांडे यांनी सावित्री वंदना, सौ. छाया पाथरे यांनी स्वागतगीत तर श्री गजानन काकडे यांनी पोवाडा सादर करून संमेलनाची बहारदार सुरुवात केली.मा. ड. डॉ.नीता कचवे यांनी प्रास्ताविक करून पहिल्या बांधिलकी राज्यस्तरीय साहित्य संमेलनाबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली.त्यानंतर ड. डॉ. नीता प्रफुल्ल कचवे लिखित छोट्या छोट्या गोष्टी जगण्याची देती दृष्टी संस्कार एक मौलिक शिक्षा संस्कारोंकी पाठशाला चौरश्र डीं-ेळशी डॉ. केतकी प्रदीप काळेले लिखित छुपा राक्षस हा बालकथासंग्रह,नयन पऱ्हाड लिखित जीवी जे गुंतले हा अभंगसंग्रह तर अक्षरशिल्प शिमगा विशेषांक या पुस्तकांचे दिमाखदार प्रकाशन संपन्न झाले. प्रकाशन सोहळ्यानंतर मान्यवरांचे भाषणे झाली. चॅट जीपीटी सारखे तंत्र हा लेखकाच्या व्यक्तिगत प्रतिभेवर तांत्रिकदृष्या आघात असला तरी, माणूस हा यंत्र नाही. त्याच्या मेंदुमध्ये बुद्धीमत्तेसोबत 'जाणिव' नावाची गोष्ट वसलेली आहे. अशाप्रकारचे संमेलनाचे सन्माननीय अध्यक्ष दा. गो. काळे यांनी अनेकानेकसमाजोपयोगी विचार अध्यक्षीय भाषणांतून मांडलेत.

त्यानंतर झालेल्या सन्मान सोहळ्यामध्ये बांधिलकी प्रतिष्ठनतर्फे उत्कृष्ट प्रकाशक म्हणून श्री. विकास राऊत, तसेच छाया पाथरे , श्री पुरुषोत्तमजी गावंडे, श्री.दिलीपसिंह खांबरे, डॉ केतकी काळेले , नयन पऱ्हाड, गजानन काकडे यांचा सन्मान करण्यात आला . अक्षरशिल्प प्रकाशनाकडून उत्कृष्ट संपादिका ड. डॉ . नीता प्रफुल्ल कचवे,राजेश चौरपगार, उत्कृष्ट मार्गदर्शक दा. गो. काळे, उत्कृष्ट साहित्यिक किरण डोंगरदिवे यांना पुरस्कृत करण्यात आले .

# ‘जय हरी विठ्ठल श्री हरी विठ्ठल , जय गजानन श्री गजानन, गण गण गणात बोते’, मंत्राचा नाम जप करीत शेगावच्या गजानन महाराज पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान, ७०० वारकऱ्यांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२शेगाव**

संत गजानन महाराज संस्थान मंदिराचा परिसर, रथ, मेणा अश्व, टाळ मृदूंगाचा गजर, नाम घोष, सातशे वारकरी, ओसंडून वाहणारा उत्साह आणि भारावलेले पवित्र वातावरण अशा थाटात अन् दिमाखात शेगावच्या गजानन महाराज पालखीने आज सोमवार, २ जून रोजी सकाळी श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान केले. विधिवत पूजन करण्यात आल्यावर पालखी सातशे वारकऱ्यांसह नागझरी येथील गोमाजी महाराज संस्थानकडे मार्गस्थ झाली.

### पालखीचे हे ५६ वे वर्ष

पालखी सोबत भजनी दिंडी, गज व अश्वासह ५०० वारकरी सहभागी झाले आहे. संपूर्ण राज्यभरातून आषाढी एकादशीला श्री क्षेत्र पंढरपूरला विविध संतांच्या पालख्या दिंडीसह नेण्याची परंपरा वर्षानुवर्षांपासून आहे. शेगाव येथील श्री गजानन संस्थानची पालखी परंपरा १९६८ पासून अखंड सुरु आहे. यावर्षी पालखीचे ५६ वे वर्ष असून या दिंडीमुळे विवेक, वैराग्य, भक्ती व ज्ञान या तत्वांचा लोकांना बोध होतो.

आध्यात्मिक कार्य गतीमान होवून धर्माप्रती श्रध्दा व भावना वृध्दीगंत होतात. दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, व्यसनाधिनता अशा अनेक समस्यांनी ग्रासलेली अनेक छोटी गावे पायी वारीच्या वाटेत आहेत. श्री क्षेत्र पंढरपूरपर्यंत ७२५ कि.मी. आणि श्री क्षेत्र पंढरपूर ते शेगावपर्यंत परतीचा प्रवास हा ५५० किलोमीटर आहे. पालखीचा एकुण प्रवास १२७५ किलोमीटरचा आहे. आज २ जून रोजी गजानन महाराज संस्थान मंदिर परिसरातून श्रींच्या पालखीला प्रारंभ झाला.शहरातील श्रींचे प्रगटस्थळ, देशमुख यांच्या मळ्यात वारकऱ्यांना फराळ, चहा देण्यात आला. तद्नंतर श्रींच्या पालखीने श्री क्षेत्र नागझरीकडे प्रस्थान केले



संतनगरीतील हजारो आबालावृद्ध भाविकानी आपल्या पालखीला निरोप दिला.

श्रींचे पालखी सोबत असलेल्या वारकरी मंडळींना ठिकठिकाणी चहापानी व अल्पोपहाराची व्यवस्था राहते. तसेच श्रींच्या पालखीचे गावातील नागरीकाकडून मनोभावे श्री महाराजांना शाल, श्रीफळ वाहून स्वागत केल्या जाते. श्रींचे पालखी सोबत प्रवास करताना वारक-यांची दुपारी व रात्री भोजन प्रसादाची व्यवस्था केली जाते. त्याचप्रमाणे वाटेने चहापानी व फराळाची व्यवस्था सुध्दा श्रींच्या भक्तांकडून केल्या जाते.

रात्रीचे मुक्कामी निवासाची व्यवस्था धर्मशाळा, मंगल कार्यालय व शाळा यामध्ये केलेली असते. दिंडीतील वारकरी मंडळींना आवश्यकतेनुसार औषध, इंजेक्शन, सलाईन देवून सेवार्थ औषधोपचार करण्यात येतो. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याकरीता टँकरची व्यवस्था केलेली असते. शेगाव संस्थानने पायी वारीकरीता श्री महाराजांची चांदीची नवीन पालखी बनारस येथील कारागिर आणून तयार करून घेतली आहे. त्यावरील नक्षीकाम अत्यंत कलापूर्ण असून ही पालखी पाहताक्षणीच अंत:करणातील भक्तीभाव उंचबळून येतो.

‘जय हरी विठ्ठल श्री हरी विठ्ठल , जय गजानन श्री गजानन, गण गण गणात बोते’, मंत्राचा नाम जप करीत वारकऱ्यांनी संतनगरीतून श्री विठ्ठलाच्या पंढरीकडे प्रस्थान केले.

### अकोल्यात दोन दिवस मुक्कामी

तब्बल ३३ दिवसांचा पायी प्रवास आणि ७२५ किमी चे अंतर कापून श्रींची पालखी ४ जुलै रोजी श्री क्षेत्र पंढरपूरला पोहोचणार आहे.श्रींची पालखी संतनगरी शेगावातून निघाल्यानंतर श्री क्षेत्र नागझरी येथील श्री संत गोमाजी महाराज संस्थान मध्ये पोहचणार आहे. महाप्रसाद घेऊन सायंकाळी अकोला जिल्ह्यातील पारस येथे श्रींच्या पालखीचा रात्रीचा मुक्काम राहील. ३ जुन रोजी पारस येथून निघून दुपारी गायगाव येथे तर रात्री भौरद येथे श्रींच्या पालखीचा मुक्काम राहील. ४ जून रोजी सकाळी भौरद येथून निघून अकोला येथे ४ व ५ जून असा दोन दिवस श्रींच्या पालखीचा मुक्काम राहील. त्यानंतर निर्धारित मार्गाने श्रींची पालखी ४ जुलै रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथे पालखी पोहोचणार आहे.

### ३१ जुलैला स्वगृही

श्री विठ्ठलाच्या पंढरीत श्रींच्या पालखीचा मुक्काम ४ जुलै ते ९ जुलै पर्यंत राहणार आहे. श्री गजानन महाराज संस्थानच्या पंढरपूर शाखेत श्रींच्या पालखीचा पाच दिवस मुक्काम राहणार आहे. श्रींच्या पालखीचा परतीचा प्रवास संत नगरी शेगाव कडे १० जुलै रोजी सुरू होईल. पंढरपूर ते शेगाव हा ५५० किमी चा प्रवास आहे. असा येण्या जाण्याचा १३०० किमीचा पायी प्रवास श्रींच्या पालखीतील वारकरी भक्ती भावाने आनंदात करणार आहेत. ३० जुलै रोजी खामगाव मुक्कामी राहिल्यानंतर ३१ जुलै गुरुवार रोजी श्रींची पालखी स्वगृही संतनगरी शेगावमध्ये दाखल होणार आहे.

# आरटीओ कर्मचाऱ्यांवर भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ काळ्याफिती बांधून निषेध नोंदविला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

अकोला प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर एका एजंटने केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ अमरावती आरटीओ कार्यालयात आज, सोमवार दि. २ जून २०२५ रोजी काळ्या फिती बांधून कर्मचारी यांनी निषेध नोंदविला व निदर्शने करून आरटीओ यांना निवेदन दिले. यावेळी मोटर वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर यांनी कर्मचाऱ्यांना संबोधन केले.

प्रादेशिक परिवहन कार्यालय अकोला येथील कर्मचाऱ्यांवर झालेल्या या भ्याड हल्लयाचा संघटनेच्या वतीने राज्यभरात कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या वतीने तीव्र निषेध नोंदविण्यात येत आहे . संबंधित एजंटला कार्यालयात कायमस्वरूपी येण्यास बंदी घालण्याचे प्रादेशिक अधिकारी अकोला यांनी आश्वासन दिले आहे. तसेच पोलीस प्रशासनाशी चर्चा करून योग्य ती कारवाई करण्याचेही आश्वासन मिळाले आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी , कर्मचारी आणि संघटनेचे पदाधिकारी एकत्र येऊन पुढील कारवाईसंबंधी निर्णय घेणार आहेत.


अनिल मानकर म्हणाले की, हा हल्ला केवळ अकोल्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण परिवहन विभागावर झालेला आघात आहे. त्यामुळे संपूर्ण विभाग आणि राज्यातील परिवहन कर्मचारी या वेळी आपल्याबरोबर आहेत, याची ग्वाही दिली आहे. आंदोलनादरम्यान कर्मचारी काळी फिती बांधून कामकाज केले आणि भ्याड हल्लयाचा निषेध नोंदविला. यावेळी संघटनेचे राज्य पदाधिकारी अनिल मानकर सह अभिजीत गावंडे, प्रमोद राजनेकर, संजय चौधरी , अक्षय राठोड, देवानंद खंडारे, देवेंद्र कळमकर , यशवंत रामटेके , पराग जाधव, प्रवीण मुंगळे, आशिष मातुरकर , अनिल मेश्राम ,अरुण वाघमारे , साजिद अली , जयसिंग राठोड , सोहम हेमने , स्वप्निल खडसे , श्रीकांत शिरे, ज्ञानेश्वर काळे , रितेश चुलेट , सुहास वानखडे, वीरेंद्र पटेल, प्रीती डोंगरे , हर्षदा चवात,समीक्षा वारकरी , मिनल गिरे, दीपा पात्रे, दिपाली गवळी, अश्विनी वानखडे , प्रतिभा ठाकरे, वर्षा कोटरंगे , महेश मेश्राम आदि कर्मचारी सहभागी झाले होते.

या वेळी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धार्थ ठोके यांना निवेदन देण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त करून अशा प्रकारच्या हिंसक घटनांना यथोचित आणि कठोर प्रतिसाद देणे गरजेचे असल्याचा संघटनेने इशारा दिला आहे.

# अनेक शाळांत शून्य शिक्षक; स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विद्यालयांची संचमान्यता चुकली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये २०२४-२५च्या शैक्षणिक सत्रासाठी संचमान्यता करण्यात आली आहे. पण, संचमान्यतेसाठी आवश्यक माहिती भरण्यात चुका झाल्याने आवश्यक विद्यार्थी संख्या असतानाही अनेक शाळांत शिक्षकांची कमी पदे मान्य झाली.काही ठिकाणी अक्षरश: शून्य पदे मंजूर झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. लवकरच नव्या वर्षाचे शैक्षणिक सत्र सुरू होणार असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याचा धोका आहे. संपूर्ण राज्यातून माहिती घेऊन याबाबत आवश्यक दुरुस्ती करण्याची गरज व्यक्त होत आहे.



विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात संचमान्यता निश्चित करताना प्रामुख्याने सर्व पोर्टल व यु डायस प्लसवर भरलेल्या माहितीवरून शिक्षक, मुख्याध्यापकांची पदे मान्य केली जातात. २०२४-२०२५साठी संचमान्यता भरताना काही त्रुटी संबंधितांकडून राहिल्या आहेत. त्यात काही तांत्रिक बाबीही समाविष्ट आहेत. या चुकांमुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थी संख्या असतानासुद्धा शिक्षकांची पदे निकषापेक्षा कमी मंजूर दाखविण्यात आली आहेत. काही ठिकाणी शून्य पदे मान्य केल्याचे दिसून येत असल्याचा दावा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केला आहे.राज्यातील अनेक जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये वेगवेगळ्या कारणांनी सहाय्यक शिक्षकांची व मुख्याध्यापकांची पदे आवश्यक पटसंख्येचा निकष पूर्ण करत असतानाही संचमान्यता २०२४-२०२५मध्ये आवश्यक संख्येत मान्य झालेली नाही. २८ ऑगस्ट २०१५च्या शासन निर्णयानुसार प्राथमिक शाळेची पटसंख्या सलग तीन वर्षे १५० असल्यास उच्च श्रेणी मुख्याध्यापक पद मान्य केले जाते. पटसंख्या कमी झाल्यास मुख्याध्यापकपदाला संरक्षण देण्यासाठी १०० पटसंख्या १९ सप्टेंबर २०२४च्या शासन निर्णयानुसार मान्य आहे.



२०२४-२०२५च्या संचमान्यतेसाठी झालेल्या चुका तातडीने दुरुस्त करून प्रत्यक्ष पटसंख्या लक्षात घेऊन सहाय्यक शिक्षकांची पदे मंजूर करावी, ज्याप्रमाणे माध्यमिक शाळेची पटसंख्या १५० होताच त्याचवर्षी मुख्याध्यापकाचे पद मान्य होते तोच निकष प्राथमिक शाळांना लावण्यात यावा आणि १०० पटसंख्येवर मुख्याध्यापकपदास संरक्षण देणार् या १९ सप्टेंबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार मुख्याध्यापकाचे पद मंजूर करावे, सरल पोर्टल व यु-डायस प्लसमध्ये माहिती भरताना झालेल्या चुकांबद्दल शिक्षक, मुख्याध्यापकांना दोषी धरण्यात येऊ नये, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने राज्य आयुक्त (शिक्षण), शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना पत्राद्वारे करण्यात आली आहे.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ स्व.डॉ. श्रीकांत जिचकार पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २ अमरावती**

स्व.डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या पुण्यतिथी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृतिसंवर्धन केंद्रात अभिवादन कार्यक्रम संपन्न



झाला. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी स्व. श्रीकांत जिचकार यांच्या प्रतिमेचे पूजन, हार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. पुण्यतिथी कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, आय.क्यु.ए.सी. संचालक डॉ. संदीप वाघुळे, केंद्राचे संचालक डॉ. संदीप जोशी, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नादुरकर, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, आय.आय.एम.सी. चे संचालक डॉ. राजेश कुशवाह, डॉ. विनय सोनुले तसेच विद्यापीठ अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारी उपस्थित होते.

# पाणी अडवा नव्हे, वाया घालवा; जलसंवर्धनाकडे होतेय दुर्लक्ष : पावसाळ्यात बचतीसाठी उपाययोजनाच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

जलसंवर्धन हे केवळ पाण्याची बचत करणे नाही, तर पर्यावरणाची काळजी घेणे आणि भविष्यासाठी सुरक्षित पाणी व्यवस्थापन करणे आहे. पावसाळ्यात जलसंवर्धन शक्य आहे. शासन आणि प्रशासन नागरिकांना जलसंवर्धनासाठी आवाहन करते. मात्र, अनेक शासकीय कार्यालयात पावसाळ्यात जलसंवर्धन होत नसल्याचे दिसते.

पावसाळ्यात धो-धो पाऊस कोसळतो. त्यामुळे नदी-नाल्यांना पूर येतो. मुबलक प्रमाणात पाणी दिसते. परंतु, उन्हाळा लागताच पाणी टंचाई डोके वर काढते. हे चित्र दरवर्षीच जिल्ह्यात निर्माण होते. यंदाही अमरावती जिल्ह्यातील अनेक मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पांनी पातळी गाठली. पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी, बोअरवेल आणि हातपंपही कोरडे पडले. ग्रामीण भागात तर टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ प्रशासनावर आली. शहरी भागातही नळ चार ते पाच दिवसाआड येत असल्याने नागरिकांची अडचण होत आहे. एकूणच पावसाळ्यात पावसाच्या



पाण्याचे जलसंवर्धन योग्यरित्या होत नसल्यामुळेच जलस्त्रोत कमी होत चालले आहे. नागरिकांबरोबरच शासकीय कार्यालयांनी जलसंवर्धनातून पाण्याची बचत करणे गरजेचे आहे.

### उन्हाळ्यात टंचाईचे चटके रेन हार्वेस्टिंगचे फायदे काय?

रेन वॉटर हार्वेस्टिंग म्हणजे पावसाचे पाणी गोळा करणे, साठवणे आणि त्याचा वापर करणे होय. या पद्धतीमध्ये, पावसाचे पाणी जमिनीवर पडण्याऐवजी छतावरून किंवा इतर पृष्ठभागावरून गोळा केले जाते आणि ते साठवून ठेवले जाते. जेणेकरून ते भविष्यात सिंचन, घरगुती कामे आणि इतर कामांसाठी वापरता येईल, हा त्या मागचा उद्देश असतो. काही शासकीय कार्यालयांसह नागरिकांनी देखील रेन हार्वेस्टिंग केले आहे. मात्र, याचे प्रमाण कमी आहे.

### जाब विचारणार कोण ?

पावसाचे पाणी अडवून संवर्धन करण्यासंबंधी अनेक विभाग गंभीर नाही. मात्र, या विभागांना जाब कोण विचारणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शासन जलसंवर्धनासाठी विविध उपाययोजना करीत असले, तरी अंमलबजावणीची जबाबदारी असलेले प्रशासनच उदासीन दिसत आहे.

### प्रत्येक इमारतीचे जलसंवर्धन आवश्यक

जलसंवर्धनामुळे नद्या, तलाव आणि जलाशयांमधील पाण्याची पातळी वाढू शकते. पर्यावरणाचे संतुलनराखण्यासही मदत होते. त्यामुळे प्रत्येक इमारतीचे जलसंवर्धन आवश्यक आहे.

